



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





✼ वर्ष ६५ वे ✼ अंक ५६ ✼ नांदेड ✼ शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ ✼ पृष्ठे ६ ✼ किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# मद्य घोटाळ्याप्रकरणी अरविंद केजरीवाल यांची निर्दोष मुक्तता

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** दिल्लीच्या अत्यंत वादग्रस्त दारू धोरणाशी संबंधित प्रकरणात राऊस अव्हेन्यू न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. न्यायालयाने दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांना सर्व आरोपांमधून निर्दोष मुक्त केले आहे. दोघांनाही न्यायालयाकडून क्लीन चिट मिळाली आहे.

यावेळी न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, केवळ दावे पुरेसे नाहीत. न्यायालय केवळ ठोस आणि ठोस पुराव्यांद्वारे समर्थित आरोपावर अवलंबून राहू शकते. न्यायालयाने म्हटले की तपास यंत्रणेने सादर केलेले पुरावे कमकुवत आणि अपुरे होते. प्रथम, न्यायालयाने उत्पादन शुल्क विभागाचे माजी आयुक्त



कुलदीप सिंग यांना निर्दोष मुक्त केले. त्यानंतर, मनीष सिसोदिया यांना दिलासा मिळाला आणि त्यानंतर अरविंद केजरीवाल यांनाही निर्दोष मुक्त करण्यात आले.

न्यायालयाच्या निकालानंतर प्रतिक्रिया देताना म्हणाले, आम्ही नेहमी सांगायचो सत्याचा विजय होतो. आम्हाला भारतीय न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे. ज्या न्यायमूर्तींनी आमच्यासोबत न्याय केला त्यांचे धन्यवाद. सत्याचा विजय झाला, मी नेहमी सांगायचो भगवान आमच्यासोबत आहे. आम आदमी पार्टीला संपवण्यासाठी पक्षाच्या सर्वात मोठ्या पाच नेत्यांना तुरुंगात टाकलं. विद्यमान मुख्यमंत्र्याला घरातून फरफटत नेऊन तुरुंगात टाकलं, सहा महिने आत ठेवलं गेलं.जे भारताच्या इतिहासात कधी घडलं नाही. केजरीवाल भ्रष्ट नाही. केजरीवाल भ्रष्ट नाही. मी माझ्या आयुष्यात इमानदारी कमावली. यांनी खोटी केस लावली, ते आज सिद्ध झालं.कोर्टानं म्हटलं केजरीवाल कट्टर इमानदार, मनीष सिसोदिया कट्टर इमानदार आहेत. आम आदमी पार्टी कट्टर इमानदार आहे.

दिल्लीच्या मद्यधोरणाशी संबंधित प्रकरणात न्यायालयाने निर्दोष मुक्तता दिल्यानंतर माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल **(पान ६ वर...)**

## रोहित पवारांचा एफआयआर का घेत नाही, सरकार संशयाची भूतं नाचवतंय -राज ठाकरे

**मुंबई (प्रतिनिधी)–** दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीबीआय चौकशी व्हावी, तसेच संबंधित कंपनीवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करत आमदार रोहित पवार यांनी बारामती पोलीस स्टेशनमध्ये ठिय्या मांडला होता. मात्र, पोलीस अधिकाऱ्यांनी गुन्हा दाखल करण्यास अनुकूलता दर्शवली नाही. त्यानंतर, रोहित पवारांनी शुक्रवारी मनसेप्रमुख राज ठाकरे यांची भेट घेऊन याविषयी चर्चा केली. तसेच, या लढ्यात राज ठाकरे हे पूर्ण ताकदीनिशी आमच्या पाठीशी उभं राहतील, असा विश्वासही व्यक्त केला होता. त्यानंतर, आता राज ठाकरेंनी पत्रकार परिषद घेऊन रोहित पवारांच्या भूमिकेवर परखडपणे भाष्य केलं. पोलीस रोहित पवारांचा एफआयआर का घेत नाहीत, सरकारच संशयाची भूतं नाचवतंय, असे म्हणत सरकारला लक्ष्य केलं.

पत्रकार परिषदेत बोलताना राज ठाकरे म्हणाले की, अजित पवार गेल्यानंतर अनेक संशयाची भूत फिरत आहेत. अपघात हा धुक्याने झाला की धोक्याने हे सुरू आहे, रोहित पवार यांनी सगळ्या टेक्निकल गोष्टी सांगितल्या. पण त्यात एक बाब अशी की, त्यांनी तीन ठिकाणी तक्रार करण्याचा प्रयत्न केला पण पोलीस तक्रार घेत नाही, गुन्हा दाखल करत नाहीत. इथेच संशय तयार होतो, असे राज ठाकरे यांनी म्हटले. मरीन ड्राईव्हला एक अधिकारी एफआयआर लिहित होते, मग डीसीपी आले आणि म्हणाले की तक्रार घ्यायची नाही, हे काय आहे? जर त्यांच्या कुटुंबातून कोणाला तरी तक्रार द्यायची आहे, मग सरकार का अडथळे आणत आहे? सुनेत्रा वहिनी ह्या आता सरकारमध्ये आहेत. राज्यात सांगितले जाते की कुठेही एफआयआर नोंदवू शकता. पण एफआयआर नोंदवायला गेलेला माणूस त्याची तक्रार घेतली जात नाही मग यातच काळ बेरं आहे का? असे सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केले आहेत.

## वसमत-नांदेड महामार्गावर कार उलटून तिघांचा मृत्यू; दोनजण गंभीर जखमी

**नांदेड (प्रतिनिधी)–** वसमत- आसेगाव - नांदेड महामार्गावरील टाकळगाव शिवारात गुरूवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी एक भीषण अपघात घडला. लग्नावरून परतणाऱ्या मित्रांच्या कारला झालेल्या या भीषण अपघातात तीन तरुणांचा मृत्यू झाला असून अन्य दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. मृत आणि जखमी सर्वजण नांदेड शहरातील तरोडा व विजयनगर भागातील रहिवासी आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नांदेडच्या विजयनगर आणि तरोडा परिसरातील पाच मित्र परभणी येथे एका लग्नकार्यासाठी गेले होते. दुपारी लग्न उरकून कारने ते नांदेडकडे परतत होते. टाकळगाव शिवारात आले असता, अचानक कारवरील ताबा सुटला आणि भरधाव कार रस्त्याशेजारील एका पत्र्याच्या शेडवर जाऊन जोरात आदळली.








या अपघाताचा वेग एवढा प्रचंड होता की, कारचा चक्काचूर झाला आहे. आशिष मनोहर भास्करे (वय ३७, रा. तरोडा नाका) यांचा जागीच मृत्यू झाला. तर निखिल शंकरराव खंदारे (वय ३२, रा. विजयनगर) यांचा नांदेडला उपचारासाठी नेत असताना वाटेतच मृत्यू झाला. तर जखमी आकाश ढोकणे (वय २५) याचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला.

या घटनेत सिद्धांत सोपान सांगवीकर (३०) आणि अनवेश अशोकराव येडके (३१) हे दोन तरुण गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर नांदेड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच वसमत ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन बोराटे आणि त्यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तातडीने रुग्णवाहिकेतून पुढील उपचारासाठी हलवण्यात आले. या घटनेमुळे तरोडा परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## नांदेडमध्ये काँग्रेस पक्षात अंतर्गत मतभेद वाढले; कार्यकर्ते सैरभैर

**नांदेड (प्रतिनिधी)–** सध्या शहर आणि जिल्ह्यात कोणत्या ना कोणत्या कारणाने काँग्रेस पक्ष चर्चेचा विषय बनत आहे. पक्षातील अंतर्गत मतभेद राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनत आहेत.

अलीकडेच शहर काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष बालाजी चव्हाण यांनी प्रदेशाध्यक्षांना पत्र पाठवून फक्त हिंदू नेत्यांनाच स्वीकृत सदस्य बनवण्याची मागणी केली होती. त्याचप्रमाणे पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवून हरलेल्या कोणत्याही उमेदवाराला स्वीकृत सदस्य बनवू नये अशी मागणी त्यांनी केली होती. या संदर्भात प्रदेश काँग्रेस कमिटीने शहराध्यक्ष अब्दुल सत्तार यांना पत्र पाठवून काँग्रेसच्या तिकीटावर निवडणूक हरलेल्या कोणत्याही उमेदवाराला स्वीकृत सदस्य बनवू नये असे निर्देश दिले होते. बालाजी चव्हाण यांचे पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर काँग्रेस कमिटी अल्पसंख्याक विभागाचे शहराध्यक्ष अब्दुल अजीज कुरेशी, नगरसेवक बाबूभाई खोखेवाले, गणेश शिंगे, सय्यद हबीब भाई या लोकांनी प्रदेशाध्यक्षांना बालाजी चव्हाण यांच्याबद्दल तक्रार करणारे पत्र पाठवले आणि म्हटले की, प्रभाग क्रमांक १४ मधील पक्षाच्या उमेदवारांच्या निवडणूक प्रचारात बालाजी चव्हाण यांनी भाग घेतला नाही आणि हिंदू समाजातील स्वीकृत सदस्य बनवण्याची मागणी करून त्यांनी इतर समाजातील लोकांच्या भावना दुखावल्या आहेत. काँग्रेस पक्ष हा धर्मनिरपेक्ष पक्ष आहे, त्यामुळे बालाजी चव्हाण यांच्यावर कारवाई करावी. जिल्हाध्यक्ष दक्षिण हणमंत पाटील बेटमोगरेकर यांनी नुकतीच नायगाव येथे जिल्ह्यातील दक्षिण विभागाची बैठक घेतली आणि तालुकाध्यक्ष आणि इतर अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. या संदर्भात लोहाचे तालुकाध्यक्ष मधुकर दिघे यांनी प्रदेशाध्यक्षांची भेट घेतली आणि त्यांना तक्रार केली की, त्यांना न कळवता हणमंत पाटील बेटमोगरेकर यांनी त्यांना तालुकाध्यक्ष पदावरून काढून टाकले आहे आणि गणेश घोरबांड यांना लोहा तालुकाध्यक्ष बनवले आहे. तसेच त्यांनी देगलूर महिला अध्यक्षपदी पूजा गायकवाड यांची नियुक्ती केली होती. या सर्व बाबींबाबत महाराष्ट्र प्रदेश कमिटीकडे तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर शुक्रवारी महाराष्ट्र प्रदेश कमिटीने जिल्हाध्यक्ष हणमंत पाटील यांना पत्र पाठवून म्हटले आहे की, तालुका आणि ब्लॉक अध्यक्षांची नियुक्ती महाराष्ट्र प्रदेश कमिटीकडून केली जाते. जिल्हाध्यक्षांना या पदाधिकाऱ्यांचा नियुक्ती करण्याचा अधिकार नाही. यावरून काँग्रेस पक्षात दिवसेंदिवस गटबाजी वाढत असल्याचे चव्हाट्यावर आले आहे. या सर्व बाबी लक्षात घेता, ज्याप्रमाणे नांदेड महापालिकेतील पक्षाचे नगरसेवक ७३ वरून १० पर्यंत कमी झाले आहेत, त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेतही काँग्रेसला फटका बसण्याचे काहीसे चित्र निर्माण झाले आहे.

## बारावी पेपरफुटीत धक्कादायक ट्विस्ट; रसायन-भौतिकशास्त्रानंतर गणिताचाही पेपर लीक

**मुंबई (प्रतिनिधी)–** नागपूरमध्ये बारावी परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणाने गंभीर वळण घेतले आहे. रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्रानंतर आता गणिताचाही पेपर फुटल्याचे डिजिटल पुरावे समोर आल्याने हे प्रकरण केवळ अपघाती नसून संघटित रॅकेट असल्याचा संशय बळावला आहे.

१६ फेब्रुवारीला रसायनशास्त्र आणि १८ तारखेला भौतिकशास्त्राचा पेपर फुटल्याचे उघड झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान अटकेतील आरोपींनी आपले मोबाईल फॉरमॅट केल्याचे निष्पन्न झाले. मात्र, पोलिसांनी डिलिट केलेला डेटा पुन्हा रिकव्हर केला असता २१ फेब्रुवारीला गणिताचा तिसरा पेपरही प्रसारित झाल्याचे डिजिटल पुरावे समोर आले. विशेष म्हणजे, सेंट उर्सुला शाळेतील एका विद्यार्थिनीच्या मोबाईलवरून १६ फेब्रुवारीला रसायनशास्त्र आणि १८ फेब्रुवारीला भौतिकशास्त्राचा पेपर प्रसारित झाल्याचे आधीच उघड झाले होते. आता गणिताचा पेपरही त्याच साखळीतून बाहेर गेल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणात शिक्षक निशिकांत मून याला अटक करण्यात आली आहे. तसेच एक्सेलन्ट अकादमीचे मुस्तफा खान आणि जुनेद जावेद यांनाही जेरबंद करण्यात आले आहे. एका विद्यार्थ्याला जामीन मंजूर झाला आहे. मात्र, या संपूर्ण रॅकेटचा मुख्य सूत्रधार असलेला पाचवा आरोपी अद्याप पोलिसांच्या तावडीत सापडलेला नाही. त्याचा शोध घेण्यासाठी पाच सदस्यांचे विशेष तपास पथक कार्यरत आहे.

दरम्यान, या प्रकरणात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. काही परीक्षा केंद्रांवर विज्ञान शाखेच्या प्रश्नपत्रिका कमी प्रमाणात पोहोचल्याची तक्रार पर्यवेक्षकांनी केली आहे. २५ ऐवजी २४ प्रश्नपत्रिका मिळाल्याचे निदर्शनास आले. फिजिक्स, केमिस्ट्री, गणित आणि बायोलॉजीच्या पेपरसंदर्भात ही बाब घडल्याने संशय अधिक गडद झाला आहे. प्रेसमधून सीलबंद पाकिटे थेट परीक्षा केंद्रांवर पाठवली जात असताना लिफाफ्यातून प्रश्नपत्रिका कशा गायब झाल्या, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## राष्ट्रीय महामार्गावर रानडुकराच्या हल्ल्यात पोलीस कर्मचारी जखमी

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय महामार्गावरील वळन रस्त्यावर कर्तव्य बजावत असताना पोलीस कर्मचाऱ्यांना पाठीमागून आलेल्या रानडुकरांनी जोरदार धडक दिल्याने पोलीस कर्मचारी जखमी झाल्याची घटना शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी घडली असल्याची माहिती महामार्ग पोलिसांनी दिली आहे.

अर्धापूर राष्ट्रीय महामार्गावर महामार्गाचे पोलीस पोलीस कर्मचारी कर्तव्य बजावत असताना रानडुकराने पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत त्यांच्या डाव्या पायाच्या मांडीला दुखापत झाली आहे. जखमी पोलीस कर्मचारी सयाजी दत्ता कदम यांना तात्काळ अर्धापूर येथील ग्राम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. महामार्गाच्या पोलीस कर्मचाऱ्यावर उपचार सुरू असल्याची माहिती महामार्ग पोलिसांनी दिली आहे.

## शरद पवारांसाठी राज्यसभा सोडण्यास ठाकरे गटाचा नकार

**मुंबई (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासाठी राज्यसभा सोडण्यास शिवसेना ठाकरे गटाने नकार दिल्यामुळे महाविकास आघाडीत संघर्ष पेटण्याची चिन्हे आहेत.

राज्यसभेच्या जागेसाठी कुठल्याही परिस्थितीत आम्ही आमचा दावा सोडणार नाही, आमच्या पक्षातील आमदारांनी उद्धव ठाकरेंसमोर आपले मत मांडले आहे. २०२० मध्ये आम्ही फौजिया खान यांच्या उमेदवारीवेळी मदत केली होती. मात्र, आमचे उमेदवार संजय पवार हे संख्याबळ असताना सुद्धा पराभूत झाले. आता आमचे संख्याबळ अधिक आहे. त्यामुळे जर आमचा खासदार कार्यकाळ पूर्ण करत असेल, तर आमच्याच पक्षाचा उमेदवार राज्यसभेसाठी जाईल, असे ते म्हणाले.


## रेल्वे गाड्यांमध्ये व स्थानकांवर अनाधिकृत विक्रेत्यांविरुद्ध आठवडाभर विशेष मोहिम

### ५६ अनाधिकृत फेरी वाल्यांवर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात रेल्वे गाड्यांमध्ये व रेल्वे स्थानकांवर अनाधिकृत विक्रेत्यांविरुद्ध राबविण्यात आलेली ७ दिवसीय विशेष मोहीम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. ही मोहीम दि. २० फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान राबविण्यात आली. या मोहिमेत ५६ अनाधिकृत फेरी वाल्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

प्रवाशांना सुरक्षित, स्वच्छ व नियमनबद्ध सेवा उपलब्ध करून देणे तसेच अनधिकृत विक्रेत्यांच्या समस्येला आळा घालणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. या मोहिमेदरम्यान नांदेड विभाग अंतर्गत विविध स्थानकांवर आणि गाड्यामध्ये व्यापक तपासण्या करण्यात आल्या. अधिकृत विक्रेत्यांनी वैध परवाना व ओळखपत्र दर्शविणे तसेच रेल्वेने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करणे यावर विशेष भर देण्यात आला. सततच्या अंमलबजावणीमुळे या मोहिमेत एकूण ५६ अनाधिकृत विक्रीची प्रकरणे आढळून आली असून संबंधितांविरुद्ध रेल्वे कायद्यानुसार आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. योग्य त्या प्रकरणांमध्ये अनाधिकृत विक्रेत्यांना पुढील कारवाईसाठी आरपीएफकडे सोपविण्यात आले. या मोहिमेदरम्यान एकूण २३ हजार १६५ इतका दंड वसूल करण्यात आला असून रेल्वे परिसरात शिस्त व सुव्यवस्था राखण्याच्या विभागाच्या बांधिलकीचे हे द्योतक आहे.

केवळ वैध परवाना व ओळखपत्र दर्शविणाऱ्या अधिकृत विक्रेत्यांकडूनच खाद्यपदार्थ व इतर वस्तू खरेदी कराव्यात. तसेच अनधिकृत विक्रेत्यांना प्रोत्साहन देऊ नये व अशा कोणत्याही प्रकारची माहिती रेल्वे कर्मचाऱ्यांना किंवा रेल्वे हेल्पलाईन १३९ वर कळवावी, असे आवाहन रेल्वे विभागाकडून करण्यात आले आहे.




## पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाची परिक्षेत्रात अवैध व्यवसायिकांविरुध्द मोहिम

### अहमदपूरात मोठा वाळू साठा जप्त; किनगाव, कळमनुरीत मटक्याविरुध्द कारवाया; दोन कोटी रुपयांची साधनसामुग्री, वाळू व रोख रक्कम जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्या कार्यालयातील अधिकारी व अंमलदारांचे पथक अहमदपुर येथे पाठविले होते. सदर पथकास, दि. २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ९.४५ वा. दरम्यान पोलीस ठाणे अहमदपूर हद्दीत अहमदपूर ते नांदेड जाणारे रोडचे बाजूला रुई शेत शिवारामध्ये मोठया प्रमाणावर अवैधरित्या वाळू साठवणूक केल्याचे आढळून आले.

सदर ठिकाणी साठवणूक केलेली वाळू ही नांदेड येथून हायवाव्दारे आणली जात होती व नंतर ती विविध वाहनांतून गरजेप्रमाणे अहमदपूरसह लातूर जिल्हयातील इतर ठिकाणी पाठविण्यात येत होती. पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला असता, त्यांना काही लोक जेसीबी मशीन व इतर



वाहनांसह उपरोक्तप्रमाणे कामकाजात मग्न असल्याचे आढळून आले. पथकाने या ठिकाणाहून ६ टाटा कंपनीचे हायवा, एक जेसीबी मशीन यासह, साठवून ठेवलेली (२२०) ब्रास वाळू, असा एकूण २ कोटी २१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमूद प्रकरणात पोलीस ठाणे अहमदपुर येथे गुरनं ९१/२०२६ कलम ३०३(२), ३(५), भारतीय न्याय संहिता सह कलम १५ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ अन्वये (७) आरोपीतांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस ठाणे अहमदपुर येथील पोउपनि रवि बुरकुले हे करीत आहेत.

मागील दोन दिवसांत, पथकाने लातूर जिल्हयातील किनगांव, नांदेड जिल्हयातील पोलीस ठाणे मुदखेड व उमरी, हिंगोली जिल्हयातील कळमनूरी, त्याचप्रमाणे परभणी जिल्हयातील गंगाखेड पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध रेतीसह मटका - जुगाराच्या आणखी (५) कारवाया केल्या असून, सर्व कारवायांमध्ये मिळून एकूण रुपये २, ४२, ४६, ०६० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ संजीव जिंकलवाड, पोकॉ गणेश धुमाळ व पोकॉ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर किंवा ९१ ५० १०० १०० या 'खबर' हेल्पलाइनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

## भारताचा क्रिकेटपटू रिंकू सिंहच्या वडिलांचे निधन

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतीय क्रिकेट संघाचा आघाडीचा फलंदाज रिंकू सिंह यांचे वडील खचंद्र सिंह यांचे शुक्रवारी पहाटे निधन झाले.

खचंद्र सिंह यांनी स्टेज-४ चा यकृताचा कर्करोग होता. अलीकडेच त्यांची प्रकृती अचानक खालावल्याने त्यांना ग्रेटर नोएडा येथील यथार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. वडिलांची प्रकृती खालावल्याचे समजल्यानंतर रिंकू सिंह टीम इंडियाची साथ सोडून घरी परतला होता. गेल्या दोन दिवसांपासून रिंकू सिंहच्या वडिलांची प्रकृती चिंताजनक होती. त्यांना कृत्रिम श्वसनप्रणालीवर ठेवण्यात आले. अखेर आज पहाटे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. रिंकू २४ फेब्रुवारी रोजी चेन्नई सोडत प्रथम दिल्लीला पोहोचला आणि नंतर ग्रेटर नोएडा येथे रुग्णालयात दाखल असलेल्या वडिलांना भेटला होता. हीच त्यांची अखेरची भेट ठरली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# कृत्रिम बुद्धिमत्तेचे आव्हान कसे पेलणार?

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही भारतासाठी नव्या युगाची घोषणा ठरावी, अशी अपेक्षा आहे. अभियांत्रिकी, माहिती-तंत्रज्ञान आणि डेटा सायन्स क्षेत्रात मोठी मानवी भांडवल असलेला देश म्हणून भारताने एआयच्या जागतिक स्पर्धेत आत्मविश्वासाने उडी घ्यावी, अशी सर्वसाधारण धारणा निर्माण झाली आहे. अलीकडील एआय परिषदांमधील घोषणांमुळे भारत 'डिजिटल शतकाचा नेता' होईल, असा संदेश देण्याचा प्रयत्न झाला. काही परिषदांमध्ये नियोजनातील त्रुटी, समन्वयाचा अभाव, विलंब आणि अपेक्षित निष्कर्ष न मिळणे या बाबींमुळे भारताच्या तयारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. एका खासगी विद्यापीठाने परदेशी बनावटीचा रोबोट स्वतःचा असल्याचे सादर केल्याची घटना तर शिक्षण आणि संशोधन व्यवस्थेतील पोकळी उघड करणारी ठरली. अपवाद वगळता संशोधनाची गुणवत्ता, पीएच.डी. पदव्यांचे अवमूल्यन आणि नावापुरती नवकल्पना ही गंभीर बाब आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मानव-केंद्रित एआय'ची संकल्पना मांडत तंत्रज्ञान मानवहितासाठी वापरण्याचा संदेश दिला. ही दृष्टी आकर्षक आहे. या तंत्रज्ञानावर नियंत्रण, निरीक्षण, भांडवलशाही आणि नफेखोर तंत्रज्ञान याबद्दल जगभरात निर्माण झालेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर हा दृष्टिकोन स्वागतार्हच आहे. मात्र केवळ विचारसरणी मांडून चालत नाही; तिच्या अंमलबजावणीसाठी भक्कम देशांतर्गत क्षमता आवश्यक आहे. अन्यथा नैतिक घोषणाही केवळ सांत्वनपर विधान ठरतात. यामध्ये तांत्रिक सार्वभौमत्त्वाचा प्रश्न आहे. आज भारत एआयचा मोठा वापरकर्ता आहे; परंतु उत्पादक नाही. आपल्या एआय संरचनेचा मोठा भाग परदेशी क्लाउड सेवा, विदेशी चिप डिझाईन आणि सिलिकॉन व्हॅलीतील मॉडेल्सवर आधारित आहे. आपल्या स्टार्टअप्सना भांडवल, मान्यता आणि बाजारपेठ परदेशातूनच मिळते. या प्रवाहात बदल झाला नाही, तर भारत 'बुद्धिमत्तेचा ग्राहक' राहील; निर्माता नाही. आपल्या देशातील तरुणांकडे बुद्धिमत्ता आहे म्हणूनच ते अमेरिकेसारख्या प्रगत देशांमध्ये कोणतेही आरक्षण नसताना मोठमोठ्या पदांवर काम करीत आहेत, पण त्यांचा उपयोग आपल्या देशातील शासन करून घेऊ इच्छित नाही, हे दुर्दैव म्हणावे लागेल. एआय ही केवळ आणखी एक उद्योग शाखा नाही; ती मूलभूत शक्ती आहे. डेटा, संरक्षण, वित्त, आरोग्य, शेती, माध्यमे आधुनिक जीवनाच्या प्रत्येक घटकावर तिचा प्रभाव आहे. जर ही प्रणाली परकीय मालकीची असेल, तर राष्ट्रीय प्राधान्यक्रम दुय्यम ठरू शकतात. डेटा बाहेर जाईल, नफा बाहेर जाईल आणि धोरणात्मक नियंत्रणही बाहेरच राहील. डिजिटल वसाहतवादाचा हा सूक्ष्म धोका भारताने ओळखला पाहिजे. एआयचा आणखी एक पैलू म्हणजे संसाधनांवरील ताण. सुमारे १०,३७२ कोटी रुपयांच्या मर्यादित तरतुदीत भांडवली, ऊर्जा-खाऊ तंत्रज्ञानाचा आंधळा पाठपुरावा करणे धोकादायक ठरू शकते. जागतिक स्तरावर मोठ्या गुंतवणुकीनंतरही रोजगारनिर्मिती मर्यादित आहे. उलट काही क्षेत्रांत रोजगार कमी होत असल्याची चिन्हे आहेत. मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या मक्तेदारीमुळे आर्थिक आणि सामाजिक विषमता वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या जनता विरुद्ध कृत्रिम बुद्धिमत्ता हा संघर्ष आणि असंतोष वाढतो आहे. याकडे लक्ष वेधले जाणे गरजेचे आहे. बड्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या हितासाठी सर्वसामान्यांच्या रोजगार आणि गोपनीयतेचा बळी दिला जात असल्याची टीका वाढत आहे. ही प्रतिक्रिया भारतासाठीही धोक्याची घंटा आहे. मग उपाय काय? संरक्षणवाद नव्हे, तर उद्देशपूर्ण स्वावलंबन. देशांतर्गत डेटा सेंटर्स, भारतीय भाषांवर आधारित स्वदेशी एआय मॉडेल्स, स्थानिक चिप डिझाईन आणि देशी प्लॅटफॉर्म्स यांना धोरणात्मक प्राधान्य द्यावे लागेल. 'अ‍ॅप इकॉनॉमी'पलीकडे जाऊन डीप-टेक संशोधनाला चालना देणे गरजेचे आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास अतारी ह्या अ‍ॅपचे देता येईल. व्हॉट्सअपपेक्षा उत्कृष्ट दर्जाचे हे संदेश वाहन करणारे भारतीय अ‍ॅप असूनसुद्धा याचा वापर आपल्या देशामध्ये नगण्य आहे. कारण याची प्रसिद्धीच केली जात नाही. म्हणूनच भांडवल गुंतवणूकदारांनी अल्पकालीन परदेशी विक्रीपेक्षा दीर्घकालीन देशांतर्गत मूल्यनिर्मितीवर भर द्यावा. यात सर्वांत महत्त्वाची भूमिका विद्यापीठांची आहे. प्रयोगशाळा, संशोधन संस्था आणि वर्गखोल्यांतूनच खऱ्या अर्थाने क्षमता निर्माण होते. आज अनेक ठिकाणी संशोधन केवळ बढती, गुणांकन किंवा परदेश दौऱ्यांपुरते मर्यादित आहे. जडजंजाल भाषेतील परंतु व्यावहारिक उपयोग नसलेले व इतरांची नक्कल करून तयार करण्यात आलेले संशोधनपत्रे ही नवकल्पनेची खरी ओळख ठरू शकत नाही. आपल्या देशात अशा प्रकारचे संशोधन करून पीएच.डी. मिळवणाऱ्यांची संख्या अतिशय जास्त चिंताजनक आहे. यासाठीच शैक्षणिक प्रामाणिकता आणि उद्योग-संलग्न संशोधन या दोन बाबींकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. एआयचा मार्ग भारतासाठी संधीही आहे आणि संकटही. बेभान उत्साह किंवा न्यूनगंड दोन्ही टोकांची भूमिका धोकादायक आहे. स्वप्नाळूपणा आणि शरणागती यांपासून दूर राहून संयम, स्पष्टता आणि आत्मनिर्भरतेच्या आधारे पावले उचलली, तरच भारत खऱ्या अर्थाने तंत्रज्ञान सार्वभौमत्व साध्य करू शकेल. अन्यथा आधुनिकतेच्या नावाखाली भवितव्य गहाण ठेवण्याचा धोका टळणार नाही.

# डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी : परंपरेला छेद देणारी समाजसुधारक

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाज अनेक सामाजिक बंधनांनी, रूढी-परंपरांनी आणि अन्यायकारक प्रथांनी ग्रासलेला होता. अशा प्रतिकूल परिस्थितीतही महिलांनी धैर्य, जिद्द आणि सामाजिक जाणिवेच्या बळावर परिवर्तनाची मशाल हाती घेतली. शिक्षणाचा प्रसार, बालविवाह, सतीप्रथा, अस्पृश्यता आणि स्त्री-अधिकार यांसारख्या प्रश्नांवर त्यांनी ठाम भूमिका घेत समाजसुधारणेचे कार्य केले. घराच्या चार भिंतीबाहेर पडून समाजजागृतीचे कार्य करणाऱ्या या धाडसी महिलांनी स्वातंत्र्यलढ्यातही सक्रिय सहभाग घेतला आणि नवभारताच्या निर्मितीत मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळेच स्त्रीशक्तीचे सामर्थ्य समाजासमोर ठळकपणे उभे राहिले आणि परिवर्तनाच्या नव्या युगाची सुरुवात झाली. याच युगातील एक प्रभावी, अभ्यासशील, दूर दृष्टिकोन ठेवणारे एक व्यक्तिमत्त्व भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासात नोंदविले गेले. ते म्हणजे डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी.

स्त्री म्हणून जन्माला येणे ही अभिमानाची आणि सौभाग्याची गोष्ट आहे, हे वाक्य त्यांच्या जीवन कार्यातून प्रत्ययास येते. विसाव्या शतकाच्या प्रारंभी रूढी, परंपरा आणि जातिभेद यांच्या कठोर चौकटीत अडकलेल्या समाजात त्यांनी केवळ स्वतःसाठीच नव्हे, तर संपूर्ण स्त्रीसमाजासाठी नवे क्षितिज खुले केले. ३० जुलै १८८६ रोजी तमिळनाडूतील पुदुक्कोट्टई येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील एस. नारायणस्वामी अय्यर हे महाराजा कॉलेजचे प्राचार्य होते, तर आई चंद्रम्मल या देवदासी परंपरेतील होत्या. त्या काळातील सामाजिक बंधनांना छेद देत नारायणस्वामी अय्यर यांनी चंद्रम्मल यांच्याशी विवाह केला आणि मुलीला शिक्षण देण्याचा धाडसी निर्णय घेतला. या प्रगत विचारसरणीचा मुथुलक्ष्मी यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोलवर परिणाम झाला. त्या काळात मुलींना शिक्षण मिळणेही कठीण असताना मुथुलक्ष्मी यांनी केवळ उच्च शिक्षणच पूर्ण केले नाही, तर १९०७ मध्ये मद्रास मेडिकल कॉलेज येथे प्रवेश मिळवणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या.






१९१२ मध्ये सात सुवर्णपदकांसह त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आणि सरकारी महिला व बालरुग्णालयात हाऊस सर्जन म्हणून कार्य सुरू केले. त्यांच्या कर्तृत्वाने महिलांसाठी नव्या दालनांचे दरवाजे उघडले. वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असताना त्यांनी 'ओल्या स्तनपान' सारख्या अमानवी प्रथांना आव्हान दिले आणि आईच्या दुधाचे महत्त्व समाजाला पटवून दिले. १९१४ मध्ये डॉ. सुंदरा रेड्डी यांच्याशी विवाह करताना त्यांनी समानतेची अट घालून स्त्रीस्वातंत्र्याचा ठोस संदेश दिला.

स्वातंत्र्यलढ्याच्या काळात त्या महात्मा गांधी यांच्या विचारांनी प्रेरित झाल्या. ॲनी बेझंट यांच्यासह त्यांनी १९१७ मध्ये महिला भारतीय संघटनेची स्थापना केली. पुढे त्या भारतातील पहिल्या महिला कायदेतज्ज्ञ बनल्या. देवदासी प्रथा रद्द करण्यासाठी त्यांनी केलेला लढा हा त्यांच्या कार्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला. महिला आणि मुलांच्या संरक्षणासाठी, शिक्षणासाठी आणि सन्मानासाठी त्यांनी अनेक कायदे आणि ठराव मांडले. १९२६ मध्ये मद्रास विधान परिषदेत नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठी विधेयक मांडले. स्त्रियांच्या मताधिकारासाठी, मुलींच्या शिक्षणासाठी आणि बालविवाह रोखण्यासाठी त्यांनी प्रभावीपणे लढा दिला. मुलींसाठी सुरक्षित निवारा आणि शिक्षणाची सोय व्हावी म्हणून १९३१ मध्ये त्यांनी 'अव्वई होम'ची स्थापना केली. वेश्यालयांतून मुक्त झालेल्या आणि निराधार मुलींसाठी हे ठिकाण नवजीवनाचे केंद्र ठरले. त्यांच्या कार्याचा शिखरबिंदू म्हणजे अड्डयार कर्करोग निवारण संस्थेची स्थापना.या संस्थेची पायाभरणी १९५२ मध्ये पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते झाली. बहिणीच्या कर्करोगामुळे झालेल्या मृत्यूने व्यथित होऊन त्यांनी सर्वसामान्यांसाठी कर्करोग उपचाराची सुविधा उभारण्याचा ध्यास घेतला. अनेक अडथळे, सरकारी उदासीनता आणि संसाधनांच्या अभावावर मात करत एका छोट्याशा झोपडीपासून सुरू झालेली ही संस्था आज आंतरराष्ट्रीय दर्जाची कर्करोग उपचारसंस्था बनली आहे.

डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी या अखिल भारतीय महिला परिषदेच्या अध्यक्षा होत्या. त्यांनी मुस्लिम आणि मागास मुलींसाठी वसतिगृह व शिष्यवृत्तीची सोय केली. स्थानिक स्वराज्य संस्थांतील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी अनिवार्य करण्याची शिफारसही त्यांनी केली. महिलांच्या हक्कांसाठी आणि नैतिक समानतेसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला.त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत भारत सरकारने १९५६ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले. त्यांच्या "My Experience as a Legislator' (माझा विधिमंडळ सदस्य म्हणून अनुभव') या पुस्तकातून त्यांच्या कार्याचा व्यापक आढावा मिळतो. हे समाजसेवेचे कार्य करतच वृद्धापकाळाने १९६८ मध्ये त्यांचे निधन झाले. स्त्रीशिक्षण, सामाजिक समानता आणि मानवतेच्या सेवेसाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी यांची जीवनगाथा आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या आई-वडिलांनी दाखवलेल्या प्रगत विचारांच्या वाटेवर चालत भारतीय स्त्रीला सन्मान आणि स्वाभिमानाची नवी दिशा दाखवणारी ही यशोगाथा.

**-डॉ. दीपाली पांडे**
पु. अ. होळकर महाविद्यालय
राणी सावरगाव

# सौंदर्यदृष्टीने टिपलेले 'आक्रंदन'!

कला उन्मुक्त असते. ती कधी सौंदर्य निर्माण करते, तर कधी उद्विग्नता उघड करते; कधी अस्थैर्य पसरवते, तर कधी समाजालाही प्रश्न विचारते. सौंदर्य व उद्विग्नता या दोन्ही भावना भिन्न असल्या, तरी कलेत त्या एकत्र येऊन अधिक तीव्र आणि थेट परिणाम घडवू शकतात. त्यामुळे कला ही केवळ अभिव्यक्तीसाठी नसून विचारांना दिशा देणारी आणि भावनांना स्पर्श करणारी सजीव प्रक्रिया आहे.

सौंदर्यदृष्टी व प्रकाश-छायेच्या विरोधातून कष्टकऱ्यांच्या जीवनातील वास्तव टिपणारा संवेदनशील, सर्जनशील व कृतिशील प्रकाशचित्रकार म्हणून नानू नेवरेंनी वेगळी ओळख निर्माण केली आहे. नेवरेंनी टिपलेल्या कृष्णधवल प्रकाशचित्रांत कथानकासोबत एक सशक्त दृश्यभाषा असते. ती चित्रे केवळ कलाकृतीपुरती मर्यादित न राहता त्या चित्रांतून सौंदर्याभिरुचीचे हृदयस्पर्शी आक्रंदन प्रकट होते. त्या आक्रंदनातून एक मूलभूत व मूलगामी मूल्यसंघर्ष अधोरेखित होतो. तो संघर्ष अस्वस्थतेचा वेध घेतो. ती अस्वस्थता माणसाला जागे करते. सत्य, संघर्ष आणि विवेकाकडे पाहायला शिकवते.

कुणावरही अन्याय झाला तरी, नेवरेंच्या छायाप्रतिभेच्या स्वभावाला दुःखाच्या, आक्रंदनाच्या हाका ऐकायला येतात. त्या यातनांतून निर्माण झालेली उद्विग्नता, कोलाहल नाट्यमयरीत्या प्रकाशचित्रांच्या माध्यमातून प्रकट होऊ लागते. त्यासाठी नेवरे आपल्या कलाकृतीत तांत्रिक व भावनिक घटकांचा समन्वय साधतात. नव्या प्रतीकांचा प्रभावी वापर करून, पारंपरिक मिथकांची आधुनिक काळाशी सुसंगत अशी मांडणी करतात. जुन्या मिथकांना समकालीन वास्तवाशी जोडून नवा आशय, नवी दिशा आणि व्यापक संदर्भ उपलब्ध करून देतात.

शेतकऱ्यांचे विषण्ण करणारे जगणे आणि त्यांच्या प्रश्नांविषयीचा उद्रेक नेवरेंनी 'माझा शेतकरी' या वास्तववादाकडून अतिवास्तववादाकडे जाणाऱ्या मोनोटोनस 'ब्लॅक अँड व्हाईट' प्रकाशचित्र मालिकेतून उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्या कलाकृतींचे प्रदर्शन नांदेड येथील २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलन परिसरातील स्व. नयन बाराहाते कलादालनात भरविण्यात आले आहे.



**'मदर इंडिया'**

एकमेकांत मिसळलेली, अनेक दृश्ये असलेली 'मदर इंडिया' ही प्रतिमा मल्टीपल एक्स्पोजर तंत्राने तयार केली आहे. प्रतिमेतील 'स्त्री'ची आकृती तिच्या जगण्यातील अंतर्गत संघर्ष आणि अस्थिरता विशद करते. संकटाशी लढणाऱ्या 'स्त्री'चा त्याग आणि सामर्थ्य दर्शविण्यासाठी पार्श्वभूमीवरील पाण्याच्या लाटांवर बंडीचे चाक एक्सपोज केले आहे. तर शेतकऱ्यांचे संघर्षमय जीवन अधोरेखित करण्यासाठी दुष्काळग्रस्त स्थिती आणि नागर दाखविले आहे. 'स्त्री' प्रतिमेला लो-कॉन्ट्रास्ट ॲम्बियंट प्रकाशात टिपल्यामुळे टोनल बॅलन्स नियंत्रित आहे. लो-अँगल सिल्हूट व पर्सपेक्टिव्ह रचना असलेली ही कलाकृती 'कन्सेप्टच्युअल आर्ट फोटोग्राफी' शैलीचा उत्तम नमुना आहे.

**'दुभंग'**–'दुभंग' या कलाकृतीत शेतकऱ्यांच्या आयुष्यातील आव्हानांचे प्रतीक म्हणून दुष्काळ व महापूर यांचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे. प्रकाशचित्रातील विस्कटलेल्या आयुष्याच्या अर्धवट रेषा, अपूर्ण आकृती व छाया-प्रकाशातील ताणतणाव हे शेतकऱ्यांच्या अस्वस्थ वर्तमानामागील आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय घटक कारणीभूत असल्याचे सूचित करतात. विशेषतः शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर ओव्हरलॅप केलेले कोरड्या जमिनीच्या तड्याचे टेक्स्चर, डोळ्याखालील तीक्ष्ण सावली, त्वचेचा पोत, भाव आणि पार्श्वभूमीतील पाण्याच्या लहरींमुळे प्रतिमेत उत्तम परिणाम साधता आला. छाया-प्रकाशाचे प्रमाणबद्ध विभाजन केल्यामुळे प्रकाशचित्राचा विषय अधिक प्रभावी झाला आहे. उच्च कॉन्ट्रास्ट व डबल एक्स्पोजरच्या साहाय्याने साकारलेली ही पोर्ट्रेट प्रतिमा आकर्षक आहे.

**'पीस'**– तीन नव्या कृषी कायद्यांविरोधात पंजाब व हरियाणातील हजारो शेतकऱ्यांनी दिल्ली येथे प्रदीर्घकाळ ऐतिहासिक आंदोलन केले. संघर्ष कितीही मोठा असला तरी शांतता व सामंजस्यामुळे विजय मिळवता येऊ शकतो; नेवरेंनी याच विचारांची दृश्य अभिव्यक्ती 'पीस' या कलाकृतीतून साकारली. शेतकऱ्यांचे जीवन, परंपरा, श्रम आणि संघर्षाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या बंडीच्या चाकावर शांततेचे, आशेचे आणि अहिंसेचे प्रतीक म्हणून कबुतर दाखविले आहे. प्रकाश-छायेचे योग्य संतुलन राखत, कबुतराची मध्यवर्ती रचना केल्यामुळे कलाकृतीतील सौंदर्यमूल्य अधिक वाढले आहे. कलात्मक गुणवत्ता आणि नवीन दृश्यरूप देणारी ही प्रतिकात्मक कलाकृती लक्ष वेधून घेते.

**'कर्णाहुती'**–कुरुक्षेत्राच्या युद्धभूमीवर निर्णायक क्षणी कर्णाच्या रथाचे चाक जमिनीत फसते. विवश झालेला कर्ण शस्त्र खाली ठेवून अर्जुनाकडे युद्धविरामाची याचना करतो; मात्र तरीसुद्धा अर्जुन प्रहार करतो आणि कर्णाचा वध होतो. महाभारतातील या प्रसंगावर आधारित नेवरेंनी 'कर्णाहुती' कलाकृती साकारली. जमिनीत फसलेल्या बंडीच्या चाकाला बाहेर काढण्याची वस्त्रविरहित शेतकऱ्याची धडपड, त्याच्या जगण्यातील संघर्ष आणि एकटेपणा कलाकृतीत ठळकपणे जाणवतो. विशेषतः दुष्काळाचे वास्तव अधोरेखित करण्यासाठी प्रतिमेत खूप जास्त निगेटिव्ह स्पेस सोडण्यात आली आहे; तर दुपारची झळ, उष्णता आणि श्रम या वातावरणनिर्मितीसाठी अतिशय तीव्र नैसर्गिक प्रकाशाचा उपयोग केला आहे. जगण्यासाठीच्या संघर्षाची कथा सांगणारी ही कलाकृती अंतर्मुख करते.

**'बाप माझा शेतकरी'**

नैसर्गिक आपत्ती, कर्जबाजारीपणा आणि सततच्या अपमानास्पद जगण्यामुळे हवालदिल झालेला शेतकरी अखेर जीवन संपविण्याचा मार्ग निवडतो. याच आशयाला अनुरूप नेवरेंनी साकारलेली 'बाप माझा शेतकरी' ही कलाकृती निःशब्द करणारी आहे. कलाकृतीत बुजगावण्याच्या प्रतीकातून शेतकरी बाप दाखविला आहे. बाप जिवंत असूनही मनाने मृत झालेल्या जन्मदात्याला मरणापासून रोखण्यासाठी चिमुकल्या लेकीने घट्ट कवटाळले आहे. हृदयस्पर्शी असलेली ही कलाकृती तंत्रदृष्ट्यादेखील तितकीच परिपूर्ण आहे. नैसर्गिक सौम्य प्रकाश, लो-अँगल, सेंटर फ्रेमिंग, प्रॉपर कम्पोझिशन व पार्श्वभूमी धूसर करण्यासाठी मध्यम 'डेप्थ ऑफ फिल्ड'चा वापर केला आहे. त्यामुळे प्रकाशचित्रात भावनिक, कौटुंबिक व सामाजिक परिणाम सहज साधता आला.

मरणाने केली सुटका, जगण्याने छळले होते...

कवी सुरेश भटांच्या रचनेतील ओळीचा संदर्भ घेऊन साकारलेली एकमेव रंगीत कलाकृती या प्रदर्शनात आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्यास भाग पाडणारी ही कलाकृती जीवन-मरणाच्या सीमारेषेवरील धूसर अवस्था सूचित करते. कलाकृतीतील रचना व मांडणीच्या दृष्टीने केंद्रस्थानी दाखविलेले सरण, जळालेली लाकडे, राख आणि पायांची प्रतिमा विषयाच्या खोलात डोकावण्यासाठी प्रवृत्त करते. उबदार नारिंगी-लाल रंगछटा, गडद पार्श्वभूमी व कॉन्ट्रास्ट वेदना, निराशा, आग आणि अंधारातील संघर्षाची धार वाढवतात. शेतकऱ्यांची अस्थिर मानसिक अवस्था अधोरेखित करण्यासाठी मोशन ब्लर केले आहे; तर डेप्थ व टेक्स्चरदेखील प्रत्येक घटकांशी सुसंगत आहे. वास्तव आणि अतिवास्तव यांना एकरूप करण्यासाठी डबल एक्सपोजरचा उपयोग केल्यामुळे, कलाकृतीतील सौंदर्यमूल्य अधिक वाढले आहे. सामाजिक वास्तवाचे दाहक प्रतिबिंब दर्शविणारी ही प्रतीकात्मक कलाकृती अत्यंत प्रभावी आणि भावगर्भ आहे.

या प्रदर्शनात खेळ मांडियेला, बालपण, हिज मास्टर व्हाईस, मृत्युदार, टोपीखाली, भूमिपुत्र, जागते रहो, कटपुतली, अगतिक, सावकारी काक, ओला दुष्काळ आणि गाव विकणे आहे. यांसारख्या विविध विषयांची कृष्ण-धवल प्रकाशचित्रे आहेत. त्या सर्व कलाकृतींतून शेतकऱ्यांविषयीच्या नेवरेंच्या अंतर्मनातील संवेदना ठळकपणे सामोरे आलेल्या आहेत.

नेवरेंचा सौंदर्यशास्त्रीय दृष्टिकोन प्रगल्भ आहे. रंगाच्या विचलनाशिवाय कष्टकऱ्यांच्या जीवनाचा सार मांडण्यासाठी आणि प्रतिमेला विशिष्ट उंची देण्यासाठी नेवरेंनी काळ्या-पांढऱ्या रंगांत प्रकाशचित्रण केले. किंबहुना आशा आणि निराशा यांचे प्रतीक असलेले हे दोनच रंग त्यांच्या प्रकाशचित्रांचा केंद्रबिंदू राहीले आहेत. एकूणच नेवरेंनी साकारलेल्या कलाकृतींचे विषय त्यातील प्रतीकात्मक घटक, वास्तववादी प्रतिमा, पार्श्वभूमी, विविध आकार, अवकाश विभाजन, पृष्ठभागाचा सूक्ष्म पोत, अग्रभाग, रचना, मूड व प्राकृतिकता या सर्व घटकांमध्ये छाया-प्रकाशाचे नियंत्रण व त्याच्या योग्य वापरामुळे त्या कलाकृती दृश्यदृष्ट्याच नव्हे तर, भावनिकदृष्ट्यादेखील प्रतिध्वनित होतात. संवादू लागतात.



**–आशिष यावले,**
नागपूर
मो. ९९२२२९००२२

# विद्रोह : समाजपरिवर्तनाचा विवेकाधिष्ठित मार्ग

नांदेड शहर २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी एका वैचारिक जागराचे साक्षीदार होणार आहे. राज्यस्तरीय विद्रोही साहित्य संमेलन म्हणजे केवळ साहित्याची परिषद नसून, तो समाजाच्या अंतरंगातील, आविष्काराचा आणि नवनिर्मितीचा उत्सव आहे. हे संमेलन सध्याच्या काळातील विद्रोहाची व्याख्या नव्याने करून साहित्य आणि समाज यांच्यातील अखंड दुवा अधिक दृढ करण्याचे काम करेल.

**विद्रोह : पुनर्निर्मितीचे तत्त्वज्ञान**

समाजातील विद्रोहाची संकल्पना अनेकदा फक्त विरोध किंवा बंडाळीपुरती मर्यादित केली जाते. प्रत्यक्षात खरा विद्रोह हा निव्वळ नकाराचे राजकारण नसून, तो एका मूल्यपूरक नवव्यवस्थेची बांधणी करण्याची प्रक्रिया आहे. अल्बेर कामू या फ्रेंच विचारवंताने म्हटल्याप्रमाणे, 'मी बंड करतो, म्हणून आम्ही आहोत'. हे विधान विद्रोहाचे सामूहिक आणि सृजनात्मक स्वरूप अधोरेखित करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'शिक्षण, आंदोलन, संघटन' हे सूत्र याच विद्रोहाला वैचारिक पायाभूतता प्रदान करते. भावनेच्या आहारी न जाता, विवेकाच्या प्रकाशातून लढा देणारा हा विद्रोहच समाजाला अर्थपूर्ण परिवर्तनाची दिशा दाखवू शकतो.

भारताच्या सामाजिक जडणघडणीत हा विवेकाधिष्ठित विद्रोह अनादी काळापासून आहे. गौतम बुद्धांपासून ते संत कबीर, संत तुकाराम आणि पुढे जोतिबा फुले यांच्यापर्यंत ही परंपरा सातत्याने प्रवाहित आहे. ही परंपरा धर्म किंवा समाज नाकारत नाही, तर त्यातील अमानवीयतेला, दांभिकतेला नकार देते. परंपरेतील मानवी मूल्यांचे संवर्धन आणि अमानुष प्रथा-परंपरांचा विरोध, हेच खऱ्या विद्रोहाचे वैशिष्ट्य आहे.

**आजचा विद्रोह:**
**नवी रणांगणे, नवी शस्त्रे**

आजचा समाज अनेक विविध आव्हानांना सामोरा जात आहे. आर्थिक विषमता, सामाजिक,धार्मिक ध्रुवीकरण, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील गदा, आणि धर्माच्या नावाखाली शोषणाची व्यवस्था निर्माण होणे या आजच्या काळातील प्रमुख समस्या आहेत. या पार्श्वभूमीवर आजच्या विद्रोहाची शस्त्रे बदलली आहेत. आता हिंसक संघर्षाची जागा प्रश्न विचारण्याचे धैर्य, असहमतीची भाषा आणि संवादाची संस्कृती यांनी घेतली पाहिजे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी संविधाननिष्ठा हीच आजच्या विद्रोहाची गुरुकिल्ली आहे. कोणताही बदल हा संविधानाच्या चौकटीत राहून, लोकशाही मूल्यांचे पालन करतच साधला पाहिजे. या संघर्षात द्वेषाला, अराजकाला स्थान नाही. जात, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन माणूसकीच्या प्रतिष्ठेसाठीचा हा संघर्ष आहे.

**साहित्य: विद्रोहाचा**
**आरसा आणि दिवा**

हा विद्रोह सामाजिक जीवनात कसा उतरतो? तर साहित्याच्या माध्यमातून. साहित्य हे समाजाचे अंतःकरण असते. ते वंचितांची वेदना शब्द देते, अन्यायाविरुद्ध सूर अलगद उठवतो. दलित साहित्य, स्त्रीवादी लेखन, आदिवासी कथा यांनी समोर आणलेले प्रश्न समाजाला अस्वस्थ करतात. ही अस्वस्थता हीच विद्रोहाची पहिली पायरी असते. जे वास्तव आपण दररोज पाहून सवयीने दुर्लक्ष करतो, ते साहित्य डोळ्यासमोर उभे करते आणि विचार करायला भाग पाडते.

मात्र, लेखकाची भूमिका केवळ हा आरसा दाखवण्यापुरती मर्यादित राहू नये. समाजपरिवर्तनाची ज्योत म्हणूनही त्याने कार्य केले पाहिजे. वाचन चळवळी उभारून ,लेखकाने प्रत्यक्ष समाजाच्या विविध घटकात जाऊन कृतिशील काम करायला हवे. शब्द आणि कृतीचा सुसंवाद हाच खरा समाजपरिवर्तनाचा मार्ग आहे.

**नांदेडचे संमेलन:**
**मेजवानी नव्हे, तर मंथन**

नांदेड येथे होत असलेले विद्रोही साहित्य संमेलन याच विचारमंथनाचे व्यासपीठ ठरणार आहे. या संमेलनाचे अध्यक्ष कवी लोकनाथ यशवंत, स्वागताध्यक्ष पँथर राहुल प्रधान, राज्याध्यक्ष प्रतिमा परदेशी आणि आणि उद्घाटक बजरंग बिहारी तिवारी यांच्या नेतृत्वात हे संमेलन अनेक सर्जनशील विचार उलगडून दाखवेल.

पारंपरिक साहित्य संमेलनांपेक्षा वेगळे ठरणारे हे संमेलन थेट समाजाशी जोडलेले प्रश्न चर्चेला घेते. भाषेचे राजकारण असो, इतिहासाचे विकृतीकरण असो, शिक्षणातील संघर्ष असो की लोकशाहीचा प्रवास; प्रत्येक विषयावर चिकित्सक दृष्टिकोनातून चर्चा होईल. चार कवी संमेलने, कथाकथन, एकांकिका, लोकनृत्ये आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. ही केवळ दोन दिवसांची कार्यक्रममालिका नाही, तर एक वैचारिक ऊर्जा केंद्र उभे करण्याचा प्रयत्न आहे. समाज जागवण्याचे, त्याला प्रश्न विचारायला लावण्याचे आणि अधिक माणूसकीच्या दिशेने नेण्याचे हे एक आंदोलन आहे.

**निमंत्रण: विवेकाच्या**
**या यात्रेत सहभागी व्हा!**

समाजपरिवर्तन ही एकट्याची जबाबदारी नाही. ही जागरूक नागरिकांची सामूहिक जबाबदारी आहे. विचारांचे हे मंथन केवळ व्यासपीठावरच्या मान्यवरांपुरते मर्यादित न ठेवता, प्रत्येकाने अनुभवले पाहिजे. प्रश्न विचारले पाहिजेत, चर्चा केली पाहिजेत आणि या ऊर्जेला स्वतःत साठवले पाहिजे. विद्रोह हे समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. नांदेडचे हे संमेलन या जिवंतपणाचा, या चैतन्याचा उत्सव आहे. हे संमेलन एक नवी आशा, एक नवी दृष्टी आणि अधिक समृद्ध, समतापूर्ण समाजाच्या दिशेने टाकलेले एक ठोस पाऊल ठरेल, यात शंका नाही.

**–डॉ. विलास ढवळे**
नांदेड
मो. ९४२२१८८१५२

# नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांची माळाकोळी पोलीस स्टेशन येथे भेट



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील माळाकोळी पोलीस स्टेशन येथे वार्षिक तपासणीच्या अनुषंगाने नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी भेट दिली.

यावेळी माळाकोळी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व गावांचे पोलीस पाटील व तंटामुक्ती अध्यक्ष उपस्थित होते. यावेळी नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी प्रत्येक गावच्या अडचणी जाणून घेतल्या व समस्या निराकरण करण्यासाठी मार्गदर्शन केले.

यावेळी पोलीस स्टेशन माळाकोळीला जनता दरबाराचेच स्वरूप आले होते, त्यांनी सामाजिक हिताच्या दृष्टीने अनेक विषयांवर चर्चा केली व मार्गदर्शन सुचवले. सोबतच वार्षिक तपासणीच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन अंतर्गत तपासणी केली. माळाकोळी पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक महेश मुळीक यांचे नियोजनबद्ध तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी उत्तम कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश मुळीक यांच्या सामाजिक जाणिवेतून विद्यार्थी व तरुणांसाठी व्हॉलीबॉलच्या नवीन ग्राऊंडचे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

एकंदरीत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवत सामाजिक दृष्टीकोण लक्षात घेऊन चांगले काम करणारा अधिकारी म्हणून माळाकोळी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश मुळीक यांच्या बाबतीत बोललं जात आहे.

याप्रसंगी पोलिसांच्या न्याय हक्कासाठी लढणारा कार्यकर्ता तथा सामाजिक कार्यकर्ते खंडेराव जाधव यांचीही उपस्थिती होती.

## स्वारातीम विद्यापीठात 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)–**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलात कविवर्य कुसुमाग्रज यांची जयंती व मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी भाषा संकुलाचे संचालक प्रा. दिलीप चव्हाण, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. शैलजा वाडीकर, मराठी विभागाचे प्रा. वैजनाथ अनमुलवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यापाठीमागची भूमिका व मराठीचे महत्त्व याविषयी प्रा. डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी सविस्तर मांडणी केली. तसेच कुसुमाग्रजांच्या 'गाभारा' या बहुचर्चित कवितेचे वाचन केले. प्रा. शैलजा वाडीकर यांनी कुसुमाग्रजांच्या साहित्यावर प्रकाश टाकला व मराठीचे वैभव याविषयी भाष्य केले, आणि 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेचे वाचन केले. दिलीप गरड, डिगांबर सत्वधर, बसवंता भोरगे, सूरज मोगले या संकुलातील विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या साहित्यनिर्मितीवर व कवितावाचन केले. अध्यक्षीय समारोप करताना प्रा. दिलीप चव्हाण यांनी मराठीचा प्रवास आणि सद्यस्थिती यावर भाष्य केले आणि मनोहर वाकोडे यांची कविता सादर केली.

# डास व कीटकजन्य रोगांवर नियंत्रण ही आंतरराष्ट्रीय गरज –कुलगुरू डॉ. मनोहर चासकर

**नांदेड (प्रतिनिधी)–** डास व इतर कीटकांच्या माध्यमातून होणारे वेक्टरजन्य रोग तसेच वाढती प्रतिजैविक प्रतिरोधकता ही जागतिक सार्वजनिक आरोग्यासमोरील गंभीर आव्हाने असून, त्यावर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी नाविन्यपूर्ण संशोधन, अंतःविषयक दृष्टीकोन आणि सशक्त आंतरराष्ट्रीय सहकार्य अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. मनोहर चासकर यांनी केले.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अधिसभा सभागृहात दि.२६ फेब्रुवारी रोजी जैवशास्त्र संकुल आणि वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषद, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जीवन विज्ञानातील नवकल्पना आणि उपयोजना : डास–कीटक माध्यमातून होणारे रोग आणि प्रतिजैविक प्रतिरोधकता' या विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते अध्यक्षीय मनोगत व्यक्त करत होते.

यावेळी व्यासपीठावर आफ्रिकामधील चेईख अंता डोईप विद्यापीठ सेनेगल येथील प्रा. ई. आय. हाडजी नियांग, थायलंड येथील केसेरटसार्ट विद्यापीठाचे प्रा. स्थियाफाप चारेओन वीरियाफाप, ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ.अशोक गिरी, डॉ. एस. के. घोष, तसेच शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, प्रा. डॉ. टी. ए. कदम, डॉ. एस. पी. चव्हाण आणि परिषदेचे समन्वयक तथा जैवशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. बी. एस. सुरवसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे कुलगुरू म्हणाले की, अशा परिषदांमुळे ज्ञानाची देवाण–घेवाण, संशोधनाचा प्रसार आणि प्रभावी धोरणात्मक उपाययोजनांची निर्मिती साध्य होते. वेक्टरजन्य रोगांचे वाढते संकट लक्षात घेता वैज्ञानिक, संशोधक व धोरणकर्त्यांनी एकत्रित प्रयत्न करणे काळाची गरज आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत देश–विदेशातील अनेक मान्यवर मार्गदर्शन करणार असून डॉ. राकेश मिश्रा (बेंगलुरू), डॉ. फ्रान्सिस लोबो (युएसए), डॉ. साखई थीईल्या (बेंगलुरू), प्रा. क्रिकलेरु फोरनास (सिंगापूर), डॉ. जिकेश नारार्क (थायलंड), डॉ. प्रसाद फडके (पुणे), डॉ. हरीश फुलेरिया (मुंबई), डॉ. आशिष सुरवाणी (बेंगलुरू), डॉ. रीना टिळक (पुणे) आणि डॉ. श्रीकांत नेना (न्यू दिल्ली) यांचा समावेश आहे.

या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. एल. एच. कांबळे, डॉ. हेमलता पाटील, डॉ. एस. टी. हजारे, डॉ. सुरेश पठाडे, डॉ. प्रशांत वक्ते, डॉ. उमेश धुलधाज, डॉ. मिलिंद गायकवाड, डॉ. संजय चव्हाण, विद्या सुकारे, प्रतिभा ढवळे, प्राजक्ता चांडोळकर, रुबिया शेख, गोविंद सूर्यवंशी व समरीन पठाण यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत महत्त्वपूर्ण सुधारणा लागू –जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## अकृषिक परवानगी, सनद तसेच अकृषिक कर पद्धतीत बदल

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार, सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठीचा अधिनियम ३१ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. या निर्णयामुळे दुहेरी परवानगी प्रक्रिया टळणार असून, नागरिकांची वेळ व आर्थिक बचत, वार्षिक करपद्धती ऐवजी सुलभ एकरकमी अधिमूल्य, प्रशासनात पारदर्शकता व सुसूत्रता राहणार आहे. याबाबतचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून ३१ डिसेंबर २०२५ पासून लागू असलेल्या सुधारणा तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येणार आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

या अधिनियमान्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा अधिनियम २०२५ (५७/२०२५) अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ ची कलमे ४२ अ, ४२ ब, ४२ क, ४२ ड व कलम ४४, ४४ अ, ४५, ४६ व ४७ अ वगळण्यात आली आहेत.

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत १० फेब्रुवारी २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. Maharashtra Land Revenue Code, १९६६ मध्ये करण्यात आलेल्या दुसऱ्या सुधारणा अधिनियम २०२५ नुसार अकृषिक (Non-gricultural) परवानगी, सनद व वार्षिक अकृषिक कर पद्धतीत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत.

**स्वतंत्र अकृषिक परवानगीची आवश्यकता रद्द**

Maharashtra Regional and Town Planning ct, १९६६ अंतर्गत नियोजन प्राधिकरणाने विकास परवानगी, बांधकाम आराखडा मंजूर केल्यास, महसूल विभागाकडून स्वतंत्र अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

# बामणी येथे आभा नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी काढले आभा कार्ड

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत अर्धापूर तालुक्यातील बामणी ग्रामपंचायतीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी भेट देऊन विविध उपक्रमांची पाहणी केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी यांच्या समन्वयातून हे अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबविले जात आहे. अभियानातील सात महत्त्वाच्या घटकांवर नियोजनबद्ध कामे करण्यात आली असून, १०० गुणांच्या निकषांनुसार अभिलेख तपासणी करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद शाळा तसेच अंगणवाडी केंद्रांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.



या भेटीदरम्यान आयुष्यमान भारत डिजिटल मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या आभा नोंदणी मोहिमेचा आढावा घेण्यात आला. आभा – आयुष्यमान भारत हेल्थ अकाऊंट हे १४ अंकी डिजिटल हेल्थ आयडी असून त्यामध्ये नागरिकांची आरोग्यविषयक माहिती सुरक्षितपणे साठवली जाते. या युनिक आयडीच्या आधारे डॉक्टरांना रुग्णांचा वैद्यकीय इतिहास सहज पाहता येतो, त्यामुळे प्रत्येक वेळी दवाखान्यात फाईल नेण्याची गरज राहत नाही. तसेच आभा क्रमांक विमा कंपन्यांशी जोडलेला असल्याने विविध आरोग्य योजनांचा लाभ वेगाने मिळण्यास मदत होते.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागात आशा व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून आभा नोंदणीची मोफत मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी स्वतः ऑनलाईन नोंदणी करावी किंवा जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेत जाऊन आभा कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी स्वतः बामणी येथील शिबिरात आभा कार्ड काढून घेत नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला. शासकीय वैद्यकीय अधिकारी, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक, पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन सर्व नागरिकांची आभा नोंदणी पूर्ण करावी, असेही त्यांनी नमूद केले.

अभियानाच्या यशस्वी अंमल–बजावणीबद्दल गटविकास अधिकारी यू. डी. तोटावाड यांच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करत तालुक्यातील सर्व टीमचे अभिनंदन करण्यात आले.

# शासनाचा शब्दभंग : १००% अनुदानाचा हक्क अजूनही हिरावलेला, टप्पावाढ घोषित करा!

## मराठवाडा शिक्षक संघाचे निवेदन

**नांदेड(प्रतिनिधी)** –राज्यातील घोषित, अघोषित, अंशत: अनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सूत्रानुसार शंभर टक्के अनुदान देऊन पाव शतकांपासून विनावेतन वा अंशत वेतनावर कार्यरत शिक्षकांची वेठबिगारी संपवावी, अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस तथा राष्ट्रीय सहसचिव एआयएसटीएफ राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष व्ही. आर. चिलवरवार यांनी याबाबत दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, राज्यातील निकषपात्र विनाअनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांवर हजारो शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत. शिक्षकांच्या लोकशाही मार्गाने झालेल्या आंदोलनामुळे २००९ साली कायम विनाअनुदान शाळांच्या मान्यतेमागील 'कायम' शब्द काढण्यात आला. त्याच वेळी २०१२ पर्यंत 'मूल्यांकन' करून प्रचलित अनुदान सूत्रानुसार अनुदान देण्याची घोषणा करण्यात आली. तेंव्हा या शाळांवर कार्यरत शिक्षकांना मोठा आनंद झाला होता. परंतु त्यास आता सोळा वर्षांचा कालावधी लोटूनही काही शिक्षक २०% तर काही शिक्षक ४०%, काही ६०% वेतनावर तर काही ८०% वेतनावर कार्यरत आहेत. पाव शतक झाले तरी हे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी शंभर टक्के वेतनापासून वंचित आहेत, ही एक प्रकारची वेठबिगारीच असल्याचे म्हटले जात आहे.

सुमारे पाव शतकांपासून वेतनासाठी संघर्ष करणाऱ्या आणि पूर्ण वेतनापासून वंचित असणाऱ्या शिक्षकांमधे प्रचंड असंतोष व चीड निर्माण झाली आहे, त्याची दखल घ्यावी. राष्ट्र शिल्पकारांची आणखीन अवहेलना न करता कायम शब्द काढलेल्या सर्व घोषित, अघोषित, अंशत: अनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सूत्रानुसार शंभर टक्के अनुदान देवून शिक्षकांची वेठबिगारी थांबवावी अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी. एस. घाडगे, व्ही. जी. पवार, अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस तथा राष्ट्रीय सहसचिव एआयएसटीएफ राजकुमार कदम, कोषाध्यक्ष औताडे ए. बी., उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, सहसचिव रेखा सोळंके, जिल्हाध्यक्ष व्ही. आर. चिलवरवार, सचिव आर. के. वाकोडे, शहराध्यक्ष डी. बी. नाईक, विजयालक्ष्मी स्वामी, जी. पी. कौसल्ये, ई. डी. पाटोदेकर, आनंद मोरे, आर. पी. वाघमारे, अब्दुल हसीब, बाबाराव घाटे, आतनूरकर यांच्या सहकारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री व शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## श्रीमती जिजाबाई शेटेवाड यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** कंधार तालुक्यातील चिखली येथील रहिवासी श्रीमती जिजाबाई चंदरराव शेटेवाड यांचे



वृद्धापकाळाने शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९० वर्षांच्या होत्या. कै. जिजाबाई शेटेवाड यांच्या पार्थिवावर शनिवारी सकाळी १० वाजता चिखली येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात २ मुले, ३ मुली, सुना, नातवंडे, असा परिवार आहे. नरसिंह विद्यालयातील शिक्षक शंकर शेटेवाड यांच्या त्या मातोश्री होत.

# महावितरणच्या स्मार्ट मीटरचा ग्राहकांना धक्का; गुरुवारी रात्री अनेकांचा वीजपुरवठा केला खंडित

**नांदेड (प्रतिनिधी)–** महावितरण कंपनी नेहमी या ना त्या कारणांमुळे चर्चेत असते. आता पुन्हा एकदा स्मार्ट मीटरवरून महावितरणच्या विरोधात वीज ग्राहकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. स्मार्ट मीटर बसविल्यानंतर वीज ग्राहकांना नको तो वीजदर येत आहे. यावर महावितरण कंपनी बोलायला तयार नाही, मात्र उलट देय तारखेच्या आत वीज ग्राहकांनी बील भरले नाही तर नियमानुसार वीजपुरवठा खंडित केला जाईल, असा सूचक इशारा महावितरण कंपनीने वीज ग्राहकांना दिला आहे.

गुरुवारी रात्री शहरातील अनेक भागांत स्मार्ट मीटरवरील वीजपुरवठा अचानक खंडित केल्याने शहरात एकच चर्चेचा विषय ठरला आणि महावितरण कंपनीबद्दल नांदेडकरांमधून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. नांदेड परिमंडळामध्ये परभणी, नांदेड आणि हिंगोली या तीन जिल्ह्यांचा समावेश आहे. या तिन्ही जिल्ह्यांमध्ये सुमारे सव्वा दोन लाख स्मार्ट मीटर ग्राहकांच्या घरी बसविण्यात आले आहेत. वीज मीटर कुठलंही असो ते जुनं जरी असलं किंवा नवीन व्हर्जनचे जरी असेल तर वीज ग्राहकाने आपल्याकडील थकबाकी वेळेवर नाही भरल्यास यापूर्वीही वीज पुरवठा खंडित करण्यात आला होता असे स्पष्ट मत महावितरण कंपनीने बोलून दाखवले आहे.

# हस्सापूर/नसरतपूर गावात गटारगंगा; नागरिक त्रस्त, ग्रामपंचायतचे दुर्लक्ष

**नांदेड (प्रतिनिधी)–** तालुक्यातील व शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या हस्सापूर / नसरतपूर गावात ग्रामपंचायतच्या दुर्लक्षामुळे गटारगंगा वाहत आहे. याचा थेट परिणाम आबालवृद्धांसह नागरिकांवर होत आहे. डबके साचल्याने डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे.



या गट ग्रामपंचायत येथील ग्रामपंचायत सदस्या शोभा नवनाथ काकडे यांनी साई कॉलनी परिसर तसेच हस्सापूर–नसरतपूर गावामध्ये मोठ्या प्रमाणावर सांडपाणी साचलेले असून, अत्यंत अस्वच्छ व धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे हे ग्रामपंचायतच्या लक्षात आणून दिले. सदर सांडपाणी नाल्यांमधून विभागात नसल्यामुळे रस्ते व घरांच्या परिसरात पाणी साचून दुर्गंधी पसरलेली आहे. डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे.

लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. ताप, डेंगू, मलेरिया व इतर साथीच्या रोगांचा धोका वाढलेला आहे. त्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

तहसीलदार यांनी स्वतः साई कॉलनी भागात येवून पाहणी करुन समस्येची गंभीर दखल घ्यावी किंवा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांना सुचना द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. सरपंच यांनी निधी उपलब्ध नाही असे सांगून आपले हात झटकले होते. निधी आल्यानंतर काम करु असे आश्वासन गावकऱ्यांना दिले होते.

# पांडुरंग गोणशेटवाड यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यातील बडूर येथील रहिवासी पांडुरंग गोविंदराव गोणशेटवाड यांचे वृद्धापकाळाने गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.

कै. पांडुरंग गोणशेटवाड यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुलं, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# बौद्ध धम्मातील मूल्येच समाजपरिवर्तनाची खरी ताकद -भदंत पय्याबोधी थेरो




**नांदेड (प्रतिनिधी)–** बौद्ध धम्मातील समता, न्याय, बंधुत्व आणि करुणेची मूल्येच समाजपरिवर्तनाची खरी ताकद आहेत. पंचशीलाचे आचरण केल्यास व्यक्ती शीलवान बनतो आणि समाजात शांततेचे वातावरण निर्माण होते, असे प्रतिपादन भदंत पय्याबोधी थेरो यांनी केले.

भोकर तालुक्यातील नागपूर येथे नुकतीच चौदावी बौद्ध धम्म परिषद संपन्न झाली. यावेळी धम्मदेशना देताना ते बोलत होते. यावेळी भंते संघपाल, भिक्खू श्रद्धानंद, भिक्खू शांतीदूत, भिक्खू संघदीप, भिक्खू सत्यशील, भिक्खू संघानंदा, भिक्खू पय्यानाम आदींची मंचावर उपस्थिती होती.

पुढे ते म्हणाले, पंचशील हा प्रत्येक बौद्धांच्या जीवनाचा पाया बनला पाहिजे. बौद्ध तत्त्वज्ञानात समता, न्याय आणि बंधुत्वाची शिकवण दिली असून, हीच मूल्ये आधुनिक लोकशाहीची आधारशीला आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटना तयार करताना बौद्ध तत्त्वज्ञानातील मानवी मूल्यांचा स्वीकार केला. त्यामुळे समाजात खरी समानता प्रस्थापित करण्यासाठी बौद्ध विचारांचे अनुसरण आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून गाथा पठणाने धम्म परिषदेची सुरुवात करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे जनसंपर्क अधिकारी मिलिंद व्यवहारे, सिद्धार्थ पाटील, गंगाधर व्यवहारे, किशनराव कसबे, बी. एस. सरोदे, भगवान जमदाडे, माधव कसबे आदी उपस्थित होते. कार्यक्रमात यश मार्केटिंगच्या वतीने भोजनदान करण्यात आले.

यावेळी सिद्धार्थ पाटील, मिलिंद व्यवहारे व यश व्यवहारे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने बौद्ध बांधव उपस्थित होते. आयोजक सरपंच दत्ता व्यवहारे, नालंदा बुद्ध विहार समिती आणि सर्व महिला मंडळ तसेच ग्रामस्थांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला.

## महात्मा गांधी हायस्कूल सिडकोचे मुख्याध्यापक महम्मद जी. एस. प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महात्मा गांधी हायस्कूल सिडकोचे मुख्याध्यापक महम्मद गोरे मियाँ महम्मद शफी मुखेडकर हे प्रदीर्घ सेवेनंतर २८ फेब्रुवारी रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत असून, २८ फेब्रुवारी २६ रोजी सेवापुर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महात्मा गांधी हायस्कूल सिडको येथे सहशिक्षक म्हणून महम्मद जी. एस. यांची १ डिसेंबर ९३ रोजी सहशिक्षक म्हणून नियुक्ती झाल्यानंतर शाळेतील विद्यार्थी संख्या व गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न केले. संस्थापक अध्यक्ष कर्मवीर नानासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली २००१ मध्ये मुख्याध्यापकपदी पदोन्नती मिळाल्यानंतर दहावी परीक्षा निकाल उत्कृष्ट लागण्यासाठी वेळोवेळी विविध विषयांचे अध्यापन घेऊन वैयक्तिक तासीका घेऊन मार्गदर्शन घेतले तर विभागीय, जिल्हा, तालुका पातळीवर आयोजित विविध स्पर्धात सहभाग घेऊन शाळेचे व संस्थेचे नावलौकिक केले,हिंदी हा आवडता विषय असल्याने विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून निकाल १००/टक्के ठेवण्यासाठी प्रयत्न केले. दहावी शालांत परीक्षामध्ये कायम उत्कृष्ट निकाल ठेवण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेळोवेळी सहकार्य करून विशेष अभ्यासक्रमा व्दारे मार्गदर्शन केले आहे.

२८ फेब्रुवारी २६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याबद्दल महात्मा गांधी हायस्कूल शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने २८ फेब्रुवारी २६ रोजी दुपारी १ वाजता संस्थेच्ये संस्थापक अध्यक्ष कर्मवीर नानासाहेब जाधव व माजी नगरसेवक तथा संस्थेचे कोषाध्यक्ष श्रीनिवास जाधव यांच्यासह मान्यवर पदाधिकारी यांच्या उपस्थितीत सेवा पुर्ती गौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## नॅनो बनाना 2 लाँच

**गुगलच्या नॅनो बनाना टूलचा वापर करून फोटो तयार करणाऱ्यांसाठी ही चांगली बातमी आहे. गुगलने नॅनो बनाना २ (जेमिनी ३.१ फ्लॅश इमेज) नावाचे त्यांचे नवीन इमेज मॉडेल लाँच केले आहे. कंपनीने गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये नॅनो बनाना सादर केले. लोकांनी त्याचा वापर करून असंख्य फोटो तयार केले. साडी ट्रेंडनेही मथळे बनवले. आता, नॅनो बनाना २ आले आहे. गुगलने म्हटले आहे, की ते लोकांना एआय वापरून 4K फोटो तयार करण्याची परवानगी देईल. हे टूल लोकांच्या सेवेत आले आहे. ते कुठे वापरता येईल ते आम्ही सांगतो...**

### नॅनो बनाना 2 म्हणजे काय?

गुगलने गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये नॅनो बनाना सादर केले. त्यानंतर, नोव्हेंबरमध्ये, त्यांनी नॅनो बनाना प्रो लाँच केले. आता, कंपनीने नॅनो बनाना २ (जेमिनी ३.१ फ्लॅश इमेज) लाँच केले आहे. हे त्याचे नवीनतम इमेज मॉडेल असल्याचे म्हटले जाते. ते दावा करते की ते उच्च-गुणवत्तेचे फोटो जलद तयार करू शकते. सीईओ सुंदर पिचाई यांनी म्हटले आहे, की हे गुगलचे आतापर्यंतचे सर्वोत्तम इमेज जनरेशन मॉडेल आहे.

### नॅनो बनाना 2 कोण वापरू शकेल?

जेमिनी ॲप : ते जेमिनी ॲपमधील विद्यमान नॅनो बनाना मॉडेल्सची जागा घेईल. कंपनीने म्हटले आहे की गुगल एआय प्रो आणि अल्ट्रा सबस्क्राइबर्स ते वापरू शकतील. ते गुगल सर्चच्या एआय मोड आणि लेन्समध्ये उपलब्ध असेल. ते ब्राउझरमध्ये देखील वापरले जाऊ शकते. ते एआय स्टुडिओ आणि जेमिनी एपीआयमध्ये प्रिव्ह्यूमध्ये देखील उपलब्ध आहे. गुगल जाहिरातींना देखील त्यात प्रवेश असेल.

### प्रमुख वैशिष्ट्ये...

- अधिक वास्तविक प्रतिमा : गुगलने म्हटले आहे की नॅनो बनाना २ मॉडेल प्रतिमा अधिक वास्तववादी दिसण्यासाठी जेमिनीच्या वास्तविक जगाच्या ज्ञानाचा वापर करते. लोक आता इन्फोग्राफिक्स तयार करू शकतात, नोट्स आकृत्यांमध्ये रूपांतरित करू शकतात आणि डेटा व्हिज्युअलायझेशनदेखील करू शकतात. नॅनो बनाना २ मजकूर अचूकपणे चित्रावर मजकूर लावण्यात आणि भाषांतरित करण्यात पारंगत झाले आहे.
- अगदी हेतूनुसार तयार करते : नॅनो बनाना २ त्याच्या वापरकर्त्यांच्या सूचना बारकाईने समजून घेऊन प्रतिमा तयार करते. ते अगदी हेतूनुसार प्रतिमा तयार करण्यास सक्षम असल्याचा दावा करते.
- उच्च-गुणवत्तेच्या प्रतिमा : नॅनो बनाना २ वापरकर्त्यांना विविध आस्पेक्ट रेशो आणि रिझोल्यूशनमध्ये, 4K पर्यंत फोटो तयार करण्यास अनुमती देईल. वापरकर्त्यांना दोलायमान प्रकाशयोजना, बवर्धित पोत आणि तीक्ष्ण तपशीलांचा अनुभव येईल असा दावा करते.

## फोन धरण्याची 'चोरीविरोधी' पद्धत जाणून घ्या...

**गर्दीच्या ठिकाणी फोन धरण्याची चोरीविरोधी पद्धत तुम्हाला माहिती आहे का? खरं तर, आजकाल गर्दीच्या ठिकाणी फोन हिसकावून घेण्याच्या घटना सामान्य झाल्या आहेत. याचे मुख्य कारण फोन हाताळण्याचा निष्काळजीपणा आहे. जर तुम्ही चोरीविरोधी पद्धत शिकलात, तर चोर तुमच्या हातातून तो हिसकावू शकणार नाहीत.**




सार्वजनिक ठिकाणी कॉल करताना तुम्ही तुमच्या फोनसोबत काही सुरक्षा उपकरणे वापरली तर कोणीही तुमच्या हातातून तो हिसकावू शकणार नाही. सामान्य पद्धतीने फोन धरताना, लोक तो खालून धरतात, वरचा भाग उघडा ठेवतात. चोरीविरोधी पकडीत, एक बोट फोनच्या वरच्या बाजूला घट्ट ठेवले जाते, ज्यामुळे तो बाहेर काढणे अशक्य होते. गर्दीच्या ठिकाणी फोन धरण्यासाठी ही पद्धत वापरली जाते. ती फोन धरण्याच्या सामान्य पद्धतीपेक्षा वेगळी आहे. या पकडीत, फोन खालून नाही तर वरून मजबूत केला जातो. तुम्ही फोटोमध्ये पाहू शकता की तुम्हाला फोन कसा धरावा लागेल. यामुळे चोरट्यांना तुमच्या हातातून फोन हिसकावून घेणे अशक्य होते. सुरुवातीला, या ग्रिपने फोन धरणे कठीण असू शकते, परंतु एकदा तुम्हाला त्याची सवय झाली की, कोणतीही अडचण येत नाही आणि तुम्ही काळजी न करता सार्वजनिक ठिकाणी फोन वापरू शकता.

### अँटी-थेफ्ट ग्रिप स्नॅचिंग कसे रोखते?

अँटी-थेफ्ट ग्रिपचे खास वैशिष्ट्य म्हणजे वापरकर्त्याला फोनच्या वरच्या बाजूला घट्ट पकड ठेवावी लागते. ज्यामुळे फोन बाहेर काढणे अशक्य होते. फोन सामान्यपणे धरताना, ग्रिप तळाशी राहते. म्हणून, वरच्या काठावरून फोन खेचल्याने हातातून सहज निसटू शकते.

### कॉल करताना फिंगर ग्रिप किंवा दोरी वापरा



सार्वजनिक ठिकाणी कॉल करताना अँटी-थेफ्ट ग्रिप कुचकामी ठरतात, ज्यामुळे ते हिसकावून घेण्याचा धोका असतो. तथापि, तुमच्या फोनसोबत फिंगर ग्रिप किंवा दोरी वापरल्याने तो तुमच्या हाताशी चिकटून राहतो. सार्वजनिक ठिकाणी तुमचा फोन वापरताना तुमच्या तळहातावर अंगठी किंवा दोरीसारखी बोटांची पकड वापरल्याने चोरीचा धोका टळतो.

## एअर कंडिशनरसाठी कोणती एसी सर्व्हिस सर्वोत्तम?



**उन्हाळा जवळ आला आहे आणि तुमचा एसी सर्व्हिस करण्याची हीच योग्य वेळ आहे. तुमच्यासमोर दोन पर्याय आहेतः जेट सेवा आणि नॉन-जेट सेवा. जर तुम्ही या दोन्ही सारख्याच मानत असाल, तर त्या नाहीत. प्रत्येक प्रकारच्या सेवेच्या स्वतःच्या आवश्यकता आणि फायदे असतात. जर तुम्ही गेल्या हंगामात तुमचा एसी सर्व्हिस केला असेल, तर सेवेच्या आवश्यकता बदलू शकतात. शिवाय, जेट एसी सेवा सामान्यतः नियमित एसी सेवेपेक्षा जास्त महाग असते. म्हणून, तुमच्या एसीसाठी कोणती सेवा सर्वोत्तम आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.**

### चुकीची सर्व्हिस तुमच्या एसीला पोहोचवू शकते नुकसान

- जेट सेवा किंवा सामान्य सेवा म्हणजे काय? : दोन्ही प्रकारच्या एसी सेवा आहेत. जेट सेवेमध्ये उच्च-दाबाच्या पाण्याच्या पंपचा वापर करून एसी धुणे समाविष्ट आहे. ही सेवा कूलिंग कॉइल्स, फिन आणि ब्लोअर स्वच्छ करण्यासाठी प्रेशर गनमधून पाण्याचा एक मजबूत जेट वापरते. सामान्य सेवेमध्ये, ज्याला ड्राय सर्व्हिस असेही म्हणतात, तंत्रज्ञ एअर फिल्टर काढून धुतो. ब्रशने कूलिंग कॉइल्स साफ करतो आणि ब्लोअरवरील धूळ साफ करतो. कमी पाणी वापरले जाते, कधीकधी फक्त स्प्रे बाटली वापरली जाते. दोन्ही सेवांमधील एक सामान्य फरक म्हणजे ड्राय सर्व्हिस जेट सेवेपेक्षा कमी खर्चिक असते.
- कोणती सेवा कधी घ्यावी? : जेट पंप सेवा हंगामाच्या सुरुवातीला म्हणजेच उन्हाळ्यात करावी. बहुतेक लोक मागील हंगामात सर्व्हिसिंग केल्यानंतर त्यांचे एसी बंद करत नाहीत. म्हणून, हंगामाच्या सुरुवातीला जेट एसी सेवा फायदेशीर आहे. यामुळे तुमच्या एसीचे कंडेन्सर आणि बाष्पीभवन कॉइल पूर्णपणे स्वच्छ करता येतात. याव्यतिरिक्त, जर तुमचा एसी दिवसभर किंवा १५-१८ तास चालत असेल, तर तुम्ही अजूनही ही सेवा निवडली पाहिजे. इतक्या काळासाठी, तुम्ही दर दोन महिन्यांनी त्याची सर्व्हिसिंग करावी.
- सामान्य सेवा कधी घ्यावी? : जर तुम्ही गेल्या हंगामात जेट सेवेनंतर तुमचा एसी बंद केला असेल, तर तुम्ही उन्हाळ्यात ड्राय सर्व्हिसनंतर किंवा सामान्य सेवेनंतर तो सुरू करू शकता. शिवाय, जर तुमचा एसी कमी वापरला जात असेल, तरीही तुम्ही ड्राय सर्व्हिसने काम करू शकता. शिवाय, हंगामात एकदा जेट सर्व्हिस घेतल्यानंतर, तुम्ही ड्राय सर्व्हिसद्वारे तुमच्या एसीची स्वच्छता स्वतः राखू शकता.
- जेट सर्व्हिसचे फायदे आणि तोटे : या सेवेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे उच्च-दाबाचे पाणी कॉइलमध्ये प्रवेश करते, ज्यामुळे वर्षानुवर्षे साचलेली घाण आणि घाण बाहेर पडते. यामुळे एसी जवळजवळ नवीनसारखा वाटतो. परिणामी, थंडावा सुधारतो. जेव्हा एसी कार्यक्षमतेने काम करू शकतो, तेव्हा कॉम्प्रेसरवर कमी ताण येतो, परिणामी वीज बिल कमी येते. शिवाय, या सेवेनंतर एसीमधून वास येत नाही. जेट सर्व्हिसचे तोटे लक्षात घेता, ते सामान्य सेवेपेक्षा महाग आहे. शिवाय, जर तंत्रज्ञ अयोग्य असेल, तर उच्च-दाबाचे पाणी एसी कॉइलच्या नाजूक ॲल्युमिनियम फिनला नुकसान करू शकते. शिवाय, ही सेवा आजूबाजूच्या भिंती आणि परिसराला घाण सोडू शकते. कारण उच्च-दाबाचे पाणी आजूबाजूला घाण पसरवू शकते.
- सामान्य सेवेचे फायदे आणि तोटे : सामान्य सेवेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे तो स्वस्त असतो. शिवाय, यामुळे एसीचे नुकसान होण्याचा धोका कमी होतो. कारण सेन्सर्स किंवा पीसीबीमध्ये पाणी जाण्याचा धोका कमी असतो. तोटे विचारात घेतले असता ते एसी वरवर स्वच्छ करू शकते परंतु कॉइल्समध्ये साचलेली घाण काढून टाकू शकत नाही. ही सेवा एसीची देखभाल करू शकते, परंतु ती कंडेन्सर आणि बाष्पीभवन कॉइल्स योग्यरित्या स्वच्छ करू शकत नाही. परिणामी, तुम्हाला कमी थंडीचा परिणाम जाणवू शकतो.
- तुम्ही कोणती सेवा घ्यावी? : जर तुम्हाला हंगामाची पहिली सेवा मिळत असेल आणि तुमचा एसी दिवसभर बराच वेळ चालत असेल, तर जेट सेवा तुमच्यासाठी सर्वोत्तम आहे. तथापि, जर तुम्ही गेल्या हंगामात जेट सेवा बंद केली असेल आणि तुमचा एसी दिवसातून ५-७ तास वापरला जात असेल, तर तुम्हाला ड्राय सर्व्हिस घ्यावीशी वाटेल.

# अजब-गजब

## चांगले का शिकवले नाही म्हणून युवतीने कॉलेजला खेचले कोर्टात!



लंडन : भरमसाठ फी देऊनही शिक्षणसंस्था विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करतीलच असे नाही. सोयी-सुविधा, दर्जेदार शिक्षणाच्या बाबतीत शिक्षण संस्था अपयशी ठरत असल्याचे दिसतात. असे प्रकार केवळ छोट्या शिक्षणसंस्थांतच घडतात असे नाही तर नामांकित संस्थाही त्याला अपवाद नाहीत. त्यामुळे नाव मोठे अन् लक्षण खोटे, असे चित्र दिसून येते. त्याबाबत विद्यार्थ्यांना संताप येत असला तरी ते मूग गिळून गप्प बसत असतात. पण ब्रिटनची एक विद्यार्थिनी चूप बसली नाही. तिने थेट आपल्या कॉलेजलाच न्यायालयात खेचले आणि आपल्याला चांगले शिकवले नसल्याबद्दल कॉलेजकडून नुकसानभरपाई मागितली.

ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटीच्या लॉ कॉलेजमध्ये ही विद्यार्थिनी शिकलेली असून, तिने कॉलेजवर प्रोफेशनल परीक्षेकरिता तयार केले नसल्याचा आरोप ठेवला आहे. त्यासाठी कॉलेजकडून ७४ लाख रुपये भरपाई मागितली आहे. २८ वर्षीय मारिया अब्रामोवा हिने दावा केला आहे, की परीक्षेआधी ऑक्सफोर्ड इन्स्टिट्यूट ऑफ लिगल प्रॅक्टिसच्या शिक्षकांनी तिला परीक्षेशी संबंधित बारकावे शिकवले नाहीत. कमजोर शिक्षणामुळे तिला परीक्षांत चांगले गुण मिळवता आले नाहीत. याच कारणामुळे तीन वर्षांपूर्वी न्यूयॉर्क बार परीक्षेत ती नापास झाली, असे तिचे म्हणणे आहे. एविएशन लॉमध्ये विशेषतज्ज्ञ म्हणून डिग्री मिळविल्यानंतर मारिया सध्या एका फर्ममध्ये पॅरालिगल म्हणून काम करत आहे. पण तिचे म्हणणे आहे की सॉलिसिटर न बनण्याची सल अजूनही तिच्या मनात कायम आहे. त्यामुळे तिने कोर्टात कॉलेजच्या विरोधात दावा दाखल केला आहे.

## वरोरातील व्यक्तीने स्वत:ला घोषित केले पंतप्रधान

**शेतीतून पाच कोटी मिळाल्यानंतर आलिशान घर, फार्च्यूनर कार अन् चक्क व्हीआयपी पर्सन...**

**चंद्रपूर : चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील एका व्यक्तीने स्वतःला 'भारताचा पंतप्रधान' घोषित केले आहे. थेट पोलीस आयुक्तांना अर्ज केला असून, पंतप्रधान पदावर नियुक्ती झाल्याने अंगरक्षणासाठी पिस्तुल व प्रमाणपत्र घरपोच देण्याची मागणी केली आहे. महादेव गुलाबराव आसेकर असे या व्यक्तीचे नाव आहे. त्याचे पत्र पाहून पोलीस आयुक्तही हैराण झाले आहेत.**

आसेकर यांनी दिलेल्या अर्जात म्हटले आहे, की मी स्वयंइच्छेने भारताच्या पंतप्रधानपदावर नियुक्त झालो आहे. त्यामुळे पंतप्रधानांना मिळणारे प्रमाणपत्र तसेच अंगरक्षणासाठी पिस्टल तत्काळ देण्यात यावे. यापूर्वी पोलीस स्टेशन वरोरा येथे अर्ज दिला, मात्र वरिष्ठ अधिकारी मागणीकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही त्यांनी अर्जात केला. वरोरा येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांना कर्तव्यात हयगय केल्याने निलंबित करण्याची मागणीही त्यांनी केली. संबंधित पदावर वर्षा तंदूलकर यांची 'पोलीस निरीक्षक (ठाणेदार)' म्हणून नियुक्ती करावी, अशीही आगळीवेगळी मागणी आसेकर यांनी अर्जात केली. या विलक्षण अर्जाची चर्चा वरोरा शहरात रंगली आहे. महादेव आसेकर यांना शेतीतून पाच कोटी मिळाल्याचे समजते. यानंतर त्यांनी वरोरा येथे आलिशान घर खरेदी केले. तसेच फार्च्यूनर कार घेतली. पूर्वी ते स्वतःला कॅबिनेट दर्जाचा माणूस असल्याचे सांगत होते. नंतर काही दिवस कारवर व्हीआयपी पर्सन असे लिहिले होते. आता तर चक्क स्वतःला स्वयंघोषित पंतप्रधान म्हणून मिरवत आहेत. विशेष म्हणजे, या गोष्टी ते सोशल मीडियावर व्हायरलही करत आहेत. वरोरा येथे ते खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या निवासस्थानाच्या परिसरात राहतात. त्यांच्या घरासमोरून कार रेस करून पुढे नेतात, अशी माहिती मिळाली आहे.




## पतीच्या विवाहबाह्य संबंधाला कंटाळून पत्नीने पतीचे घातले श्राद्ध!



सीतामढी (बिहार) : बिहारच्या जानीपूर गावात एक अनोखा प्रकार समोर आला असून, हेमा नावाच्या महिलेने आपल्या जीवंत पतीचे श्राद्ध घातले. पतीच्या विवाहबाह्य संबंधांमुळे कंटाळून तिने यापुढचे आयुष्य विधवा म्हणून काढण्याचे ठरवले आहे.

जीवंत पतीचे श्राद्ध घालणारी हेमा पहिलीच महिला ठरली आहे. ज्यानेही हे दृश्य पाहिले तो आश्चर्यचकीत झाल्याशिवाय राहिला नाही. हेमाचे लग्न २०१७ मध्ये झाले होते. तिचा पती कृष्णचंद्र ठेकेदारी करतो. लग्नानंतर दोघांचा संसार चांगला चालू होता. याचदरम्यान हेमाच्या सासूचा मृत्यू झाला. तेथूनच हेमाचे आयुष्य नरक बनत गेले. तिला कळले, की पतीचे त्याच्या वहिणीशी अनैतिक संबंध आहेत. त्यामुळे ती व्यथित झाली. आपले संबंध पत्नीला कळल्याने कृष्णचंद्र याने हेमाचा हुंड्यासाठी छळ सुरू केला. हेमाला रोज मारहाण होऊ लागली. सोबतच तिच्या डोळ्यांदेखत कृष्णचंद्र आपल्या वहिणीसोबत रासलीला मनवू लागला. त्यामुळे हेमाने माहेरी जाण्याचा निर्णय घेतला. पण हेमा घराबाहेर पडली तर आपले बिंग फोडेल म्हणून कृष्णचंद्रने तिला घरात कोंडून टाकले. हेमावर होणाऱ्या अत्याचाराची भनक तिच्या भावाला लागल्याने तो तिला भेटायला आला. मोठ्या मुश्किलीने त्याने आपल्या बहिणीला सोबत घेऊन गाव गाठले. त्यानंतर हेमाने पतीच्या घरी कधीही परत न जाण्याचा निर्णय घेतला. पतीचे श्राद्ध घालून तिने कपाळावरील कुंकूही पुसून टाकले. आता हेमा स्वतःला विधवा समजत आहे. तिने आता पतीपासून बदला घेण्याचा निर्णय घेतला आहे. ती पती व सासरच्या मंडळींवर न्यायालयात खटला दाखल करणार आहे.

## मृत्यूनंतर महिन्याने लागली महिलेला लॉटरी!


मेलबर्न (अमेरिका) : काही लोकांना आयुष्यभर पैशाचा जपच करावा लागतो. तरीही त्यांच्या हातात पैसा टिकत नाही की त्यांची आर्थिक परिस्थितीही सुधारत नाही. बऱ्याचदा तर असे घडते की त्यांना धनप्राप्ती होते पण ते धन बघण्यासाठी ते जीवंत राहत नाहीत... अशीच काहीच व्यथा अमेरिकेच्या एका महिलेची झाली आहे. ती आयुष्यभर आर्थिक विवंचनेला तोंड देत राहिली. आर्थिक अडचणीमुळे स्वतःवर उपचार करू शकली नाही अन् त्यातच तिचा मृत्यू झाला. पण मृत्यूच्या एक महिन्याने उघड झाले की तिला लॉटरी लागली आहे, तीही चक्क ४५ हजार डॉलरची. मग लोकांना तिच्या नशिबावर हसावे की रडावे असे झाले होते...

गिनी मॅक्कॉले असे या महिलेचे नाव असून, ती मिनिसोटा प्रांतातील कॉटेज ग्रोव येथील रहिवाशी होती. कॅन्सरमुळे गेल्या वर्षीच्या नोव्हेंबरमध्ये तिचा मृत्यू झाला. नेहमीच पैशाची चणचण भासत असली तरी एक ना एक दिवस आपल्याला बक्कळ पैसा मिळेल, असे तिला वाटायचे. त्यामुळेच



ती लॉटरीचे तिकिट काढायची. दोन मैत्रिणींसोबत तिने गेल्या ३० वर्षांत अनेक लॉटरीची तिकिटे काढली होती. तिघींनीही ठरवले होते, की त्यांच्यापैकी कुणालाही लॉटरी लागली की त्यांनी आपसात ते पैसे वाटून घ्यायचे. नोव्हेंबरमध्ये गिनीचा मृत्यू झाला आणि डिसेंबरच्या ख्रिसमसला तिला लॉटरी लागली. मैत्रिणींमध्ये करार केल्यानुसार, गिनीच्या दोन मैत्रिणींनी लॉटरीच्या रकमेचे तीन भाग केले आणि एक भाग गिनीचा पती पॉल मॅक्कॉले याला दिला. गिनी जीवंत असती तर इतक्या वर्षांपासून आम्ही ज्या क्षणाची प्रतीक्षा करत होतो, तो क्षण प्रत्यक्षात साकारल्याचा आनंद साजरा केला असता, असे गिनीच्या या दोन्ही मैत्रिणींनी पत्रकारांशी बोलताना साकारले.

# मराठीला ज्ञान भाषेत रूपांतरित करून पुढील पिढीपर्यंत नेऊया – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई (प्रतिनिधी)** – जगामध्ये ज्ञानभाषा असलेल्या भाषांच पुढे प्रवाहित होत असल्याचा इतिहास आहे. ज्या भाषेतून व्यवहार चालतो, रोजगार मिळतो, ती भाषा प्रगतीचा भाव जागृत करते. त्यामुळे आपल्या अभिजात मराठी भाषेला ज्ञानभाषेत रूपांतरित करून समृद्ध अशी मराठी भाषा आपण पुढील पिढीपर्यंत नेऊया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित ’जावे विनोदाच्या गावा’ या विशेष कार्यक्रमात व्यक्त केला.

कार्यक्रमास व्यासपीठावर विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, मराठी भाषा समिती प्रमुख आशुतोष काळे, विधिमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्या काळात मराठी भाषा शुद्ध होण्यासाठी शब्दकोश तयार केला. त्यावेळी प्रशासन चालविताना मराठीवर फारशी, अरबी या भाषांचे आक्रमण होते. त्यामुळे मराठी भाषेचे शुद्धीकरण करण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराज यांनी केले. मराठी भाषेचा अभिमान हा सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून सुरू होतो. सुरुवातीच्या काळातील आद्य ग्रंथांमधून आपली मराठी भाषा किती अभिजात आहे, हे आपल्याला पाहायला मिळते.

महाराष्ट्राच्या विधान मंडळात चालत असलेले कामकाज राजकीय क्षेत्र साहित्य निर्मिती करणारे आहे. या कामकाजामधूनच अनेक चित्रपट, नाट्य यांच्या कथानकांना विषय मिळत असतात. मराठीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिजात भाषेचा दर्जा देऊन राजाश्रय मिळवून दिला आहे. मराठी भाषा, आपल्या भाषेतील साहित्य आणि लोककला जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

**तंत्रज्ञान, संशोधन मराठी भाषेतून झाले पाहिजे –विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर**

मराठी भाषेला समृद्ध करायचे असेल, पुढे न्यायचे असेल तर तंत्रज्ञान, संशोधने ही मराठी भाषेतूनच झाली पाहिजेत. तेव्हा मराठी ही ज्ञानभाषा होईल, असा विश्वास विधानसभा अध्यक्ष ड राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केला.

अध्यक्ष नार्वेकर म्हणाले, मराठी भाषा ही देशातील अधिकृत २२ भाषांपैकी एक असून देशात १ हजार ६५२ बोलीभाषा आहेत. मराठी भाषिक लोकसंख्या ही देशात तिसऱ्या आणि जगामध्ये दहाव्या क्रमांकावर आहे. मराठी भाषेला समृद्ध आणि पुढे नेण्यासाठी शासनस्तरावर विविध प्रयत्न करण्यात येत आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यात आला. मराठी भाषा समृद्ध करणे आणि पुढील पिढीपर्यंत टिकवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचेही ते म्हणाले.

**संकटातही जो विनोद शोधतो तो खरा मराठी माणूस – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

मराठी माणसाच्या रक्तातच विनोद आहे. विनोद हा समाजामध्ये माणूस जोडणारा पूल आहे. त्यामुळे संकटातही जो विनोद शोधतो, तोच खरा मराठी माणूस आहे, अशा शब्दात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी माणसाचा गौरव केला.

## कोकण पर्यटन ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून पर्यटकांसाठी सुविधा निर्माण करा – राज्यमंत्री योगेश कदम

**मुंबई (प्रतिनिधी)** – रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटनाच्या अपार संधी आहेत. या भागात देश विदेशातील पर्यटक येत असतात. कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम अंतर्गत दापोली तालुक्यात पर्यटक सुविधांची कामे सुरू आहेत. या पर्यटन विकास कार्यक्रम अंतर्गत दर्जेदार स्वरूपाची कामे करून पर्यटकांसाठी उत्तम सुविधा निर्माण कराव्यात, अशा सूचना गृह (ग्रामीण) राज्यमंत्री योगेश कदम यांनी मंत्रालयात आयोजित कोकण पर्यटन ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या आढावा बैठकीत दिल्या.

बैठकीस मंत्रालयात ग्रामीण विकास विभागाचे उपसचिव सुभाष इंगळे, चिपळुण सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता हर्षल चव्हाण उपस्थित होते, तर दूरदृश्य प्रणालीद्वारे रत्नागिरी जिल्हाधिकारी मनुज जिंदाल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे यांनी बैठकीत सहभाग घेतला.

कामांचा आढावा घेत असताना राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, गावातील बचत गटांचा कोकण पर्यटन ग्रामीण विकास कार्यक्रमामध्ये सहभाग घेण्यात यावा. बचतगटाच्या सूचनांचाही अंतर्भाव करण्यात यावा. कर्दे ग्रामपंचायत हद्दीतील प्रशासकीय मान्यता मिळालेली कामे पूर्ण करावी.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सुनेत्रा पवारांना न बोलू देताच आटोपली पत्रकार परिषद

**मुंबई (प्रतिनिधी)** – राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर झालेल्या पहिल्याच पत्रकार परिषदेत प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनी सुनेत्रा पवार यांना न बोलू देताच पत्रकार परिषद आटोपती घेतली. विशेष म्हणजे ही पत्रकार परिषद सुरू होण्याआधीच नेत्यांमध्ये कुजबूत सुरू होती ती देखील आता व्हायरल झाली आहेत. पत्रकार उलटे पालटे प्रश्न विचारतील तेव्हा त्यांना मनस्थिती ठीक नाही म्हणून सांगा, याशिवाय माणसांनी अजित पवार (क्षळीं झुरुी) होते तेव्हा त्यांच्यापर्यंत पोहचू दिलं नाही आता वहिनींजवळ तरी जाऊ द्या असं बोलताना आमदार सरोज अहिर यांचा व्हिडिओ समोर आला आहे.

दादा जवळ कधी जाऊ देण्याची संधी दिली नाही, माणसांनी वहिनी जवळ तरी जाऊ द्यावं. त्यावेळी दुसरे नेते म्हणतात, प्रश्न घेऊ नका तुमचा बोलून झालं की थांबा, हे चांगलं केलं, स्पेशली प्रश्न करू नका, म्हणा मनस्थितीत नाहीत असं सांगा, बोलायचं आपलं आणि उठायचं, हे उलटे पालटे प्रश्न विचारतील ना, प्रेशर करतील तेव्हा तुम्ही उठवा, आम्ही थांबतो इथं बाजूला, बोलू नका माईक चालू आहे, अशी राष्ट्रवादीच्या नेत्यांची कुजबूज कॅमेरात कैद झाली आहे. त्याचवेळी सुनेत्रा पवार प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे पत्रकार परिषदेच्या ठिकाणी दाखल झाले, त्यावेळी सुनेत्रा पवार यांना सांगितलं, तुमचं स्टेटमेंट करायचं तुम्ही, त्याच्या पलीकडे आम्ही बोलू. त्यानंतर पत्रकार परिषद पार पडली आणि पत्रकार प्रश्न विचारण्याआधीच सगळे नेते उठले प्रफुल्ल पटेल यांनी सुनेत्रा पवारांना म्हटलं तुम्ही निघा, त्या गेल्यानंतर पुन्हा प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे पत्रकार परिषदेच्या ठिकाणी खाली बसले. ही सगळी घटना कॅमेऱ्यामध्ये कैद झाली आहे.

## कल्याणमध्ये भटक्या कुत्र्यांचा पुन्हा हल्ला; ७ वर्षांच्या मुलाचा मृत्यू

**मुंबई (प्रतिनिधी)** – काही दिवसांपूर्वीच कुत्र्याच्या चाव्यानंतर भीतीतून एका तरुणाने आत्महत्या केल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता भटक्या कुत्र्यांच्या हल्लयात सात वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू झाल्याने कल्याण शहर हादरले आहे. आणखी एक मुलगा जखमी असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.



कल्याणजवळील मोहने गाळेगाव परिसरात रस्त्यावर खेळणाऱ्या दोन मुलांवर भटक्या कुत्र्यांनी अचानक हल्ला केला. या हल्लयात दोन्ही मुलं गंभीर जखमी झाली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान सात वर्षीय खुशील वाघे याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

घटनेनंतर स्थानिक प्रतिनिधींनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाकडे धाव घेतली. परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढल्याचा मुद्दा उपस्थित करत लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेची मागणी करण्यात आली. सोसायट्यांच्या आवारातही हल्लयांच्या घटना वाढत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

दरम्यान, २३ फेब्रुवारी रोजी कल्याण पूर्व भागात ३० वर्षीय आयश विश्वनाथ अमीन याने आत्महत्या केल्याची घटना घडली होती. भटक्या कुत्र्याने चावा घेतल्यानंतर आवश्यक उपचार पूर्ण न केल्यामुळे त्याला रेबिजची लक्षणे जाणवू लागली आणि भीती आणि त्रासामुळे आत्महत्या केली.

सातत्याने घडणाऱ्या या घटनांमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी ठोस आणि तातडीची उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेत आवश्यक पावले उचलण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मुंबईपुण्यात बॉम्बस्फोटाच्या धमक्या; पासपोर्ट कार्यालय व दहिसरमधील शाळा अलर्टवर



**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील दोन महत्त्वाच्या ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणण्याच्या धमकीचे ई-मेल प्राप्त मिळाल्याने सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. पुण्यातील पासपोर्ट कार्यालय आणि मुंबईतील दहिसर परिसरातील एका नामांकित शाळेला लक्ष्य करण्याचा इशारा देण्यात आल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

**पुण्यात पासपोर्ट कार्यालयाला धमकी**

रिजनल पासपोर्ट ऑफिस पुणे येथील अधिकृत ई-मेल आयडीवर गुरुवारी सकाळी स्फोटकांच्या वापराचा उल्लेख असलेला संदेश प्राप्त झाला. बाणेरपाषाण लिंक रोड परिसरातील या कार्यालयात ठढद स्फोट घडवण्याची धमकी देण्यात आल्याचे समजते.

माहिती मिळताच पुणे पोलिसांनी यांनी तातडीने बॉम्बशोधक व नाशक पथकाला घटनास्थळी पाठवले. कार्यालय, पार्किंग तसेच आसपासच्या परिसराची सखोल तपासणी करण्यात आली. तपासादरम्यान कोणतीही स्फोटके किंवा संशयास्पद वस्तू आढळली नसल्याने प्रशासनाने दिलासा व्यक्त केला. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी बाणेर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली असून ई-मेल पाठवणाऱ्याचा शोध सुरू आहे.

दहिसरमधील शाळेला ई-मेल दरम्यान, मुंबईतील गइछउ इंटरनॅशनल शाळेलाही अशाच प्रकारचा धमकीचा संदेश प्राप्त झाला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत शाळा प्रशासनाने तात्काळ सुट्टी जाहीर केली आणि संपूर्ण परिसर सील करण्यात आला. दरम्यान मुंबई उपनगरातील सुमारे २२ ते २५ शाळांना अशाच प्रकारचे धमकीचे ई मेल प्राप्त झाल्याची माहिती समोर आली आहे. मुंबई उपनगरातील सुमारे २२ ते २५ शाळांना अशाच प्रकारचे धमकीचे ई मेल पाठवण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यामुळे या सर्व ई-मेलचा एकमेकांशी संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे.

**तपास यंत्रणा अलर्टवर**

गेल्या काही महिन्यांत महत्त्वाच्या सरकारी आणि शैक्षणिक संस्थांना अशा प्रकारचे ई-मेल येण्याच्या घटना वाढल्या आहेत. बहुतांश प्रकरणे अफवा ठरली असली तरी प्रत्येक घटनेकडे गंभीरतेने पाहिले जात आहे. पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि संशयास्पद बाब त्वरित कळवण्याचे आवाहन केले आहे.


### टी.सी. हरवली

माझी उत्तम नरहरी कदम या नावाची जि. प. प्रा. शा. म. मं. पूर्णा. ता. पूर्णा. जिल्हा परभणी चौथीची टी.सी. देगलूर नाका ते रेल्वे स्टेशन प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता. उत्तम नरहरी कदम**
**मोमीनपुरा दिवानी बोवली**
**करबला रोड. नांदेड**
**मो. ९६७३४०७४१३**

### PUBLIC NOTICE

NOTICE is hereby giveri that we are investigating the title of Rajesh Sambhaji Pawar, adult Indian inhabitant, residing at Bhagyalaxmi Niwas, 1-4-85, Phule Nagar, Nanded, Nanded, Maharashtra 431601 ("Owner), in relation to his right, title and interest in the property mentioned in the Schedule hereunder written ("Property").

All persons having any claim and/or demand against/upon/ in respect of the right, title, and interest of the Owner in the Property or any part thereof by way of inheritance, mortgage, sale, agreement for sale, grant of development rights, transfer, assignment, lease, sub-lease, license, share, lien, charge, trust, inheritance, maintenance, easement, right of way, gift, acquisition, requisition, any encumbrance or beneficial right/ interest under any trust, right of prescription or pre-emption or under any agreement or other disposition or under any suit, decree, injunction order or attachment or award passed by any Court or Authority, litigation, lis-pendens, decree or order of any adjudicating authority, exchange, partition, power of attorney, will, bequest, FSI, tenancy, development rights, family arrangement /settlement, possession, allotment or otherwise howsoever (Claims), is hereby requested to make the same known in writing together with copies of supporting documentary evidence to the undersigned at Khaitan & Co. Advocates at One World Centre, 13th Floor. Tower 1C, 841 Senapati Bapat Marg, Mumbai-400 013 and by email addressed to mumbai@khaitanco.com marked to the attention of Mr Abhiraj Gandhi, within a period of 7 (Seven) days from the date of publication hereof, failing which, it shall be presumed that no such Claims exist and if such Claims exist, it shall be deemed that such person/s has/have relinquished such Claims and/or waived any right to exercise such Claims and the same shall not be binding on the Owner and/or our client.

SCHEDULE OF PROPERTY

All that piece and parcel of land admeasuring 12,800 square meters forming part of land bearing Survey No 56 admeasuring 64,300 square meters situate, lying and being at village Vasarni, taluka Nanded, district Nanded and bounded as under
On or towards North - Survey No. 57 Vasarni, Nanded.
On or towards East - Survey No. 55 Vasarni, Nanded.
On or towards South - Survey No. 56 (Part) Vasarni, Nanded.
On or towards West - 18 Meter Wide DP Road.

Dated this 13 day of January 2026
For Khaitan & Co
**Sd/**
**Abhiraj Gandhi**
**Partner**

### Change In Name

MY OLD NAME IS **MUKHIDODDIN MAINODDIN SHAIKH**
WHICH NOW I AM CHANGING AS
NEW NAME **SHAIKH MUKHIDODIN MAINODIN** HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE CONSIDER THE SAME.
ADDRESS: 13, SHEMBOLI, TQ. MUDKHED, DIST. NANDED - 431806

### Change In Name

My Old Name is **Shivnanda Dharmaji Niwdange** which now I am changing as New Name **Mayavati Prakashrao Sawant** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - **Prakashrao Kishanrao Sawant**
Plot No. 99, Kalayan Nagar, Taroda (Bk.),
New Raj Corner, Nanded 431605
Mo.No. 9976487373

**4000 x 4 =16000 इस्क्वायर फूट**
**4 मजली हॉस्पिटल, लॉजिंग, बोर्डिंग, ऑफिस, यासाठी किरायाने देणे आहे**
9763226190
7972231307
पत्ता : कामठा बायपास गट नं. 2015 प्लॉटनं. 2 गुरुकृपा कॉम्प्लेक्स, शंकरराव चव्हाण चौक, नांदेड-431605

### प्लॉट विकणे आहे

नांदेड – लातूर हायवे रोडवर मुसमानवाडीच्या अलिकडे ब्रिजजवळ गजानन महाराज मंदिराजवळ २०० बाय १०० म्हणजे २० हजार चौरस फुट किंवा १०० बाय १०० म्हणजे १० हजार फुट जागा व त्यावरील १२.३ दुकाने बांधकामसह तीन साईट रोड टच असलेली मालमत्ता त्वरीत विकणे आहे.
**मो.नं. ८२७५५१०००६, ९४०३६३६९००**

### पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/– रू.
इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.
**–: संपर्क पत्ता :–**
**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**
**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**
**मो.नं. ९९६०१२८१९१**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशील मौजे- चांडोळा,ता. मुखेड, जि.नांदेड,येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या शेत-जमिनी ह्या सदर जमिनींचे विद्यमान मालकांकडून भाडेतत्वावर२८ वर्षे ११ महिने घेण्याकरिता बोलणी करीत असून, त्याबाबत सदर मिळकती निर्वेध व बोजा-रहित असल्या बाबत मालकी हक्क तपासणी अहवाल (टायटल व सर्च रिपोर्ट) करून घेण्यासाठी आम्हाला विनंती केल्यावरून, प्रस्तुत नोटिशीद्वारे आवाहन करण्यात येते की, जर कोणाही व्यक्ती, एकत्रित / अविभाजित कुटुंब किंवा त्याचे घटक सदस्य, बँक व इतर वित्तीय संस्था, कंपनी वा सहकारी संस्था किंवा कोणीही सावकार, कर्जदाते, किंवा इतर कोणाही त्रयस्थ इसमाचा सदर मिळकतींबाबत कुठलाही हक्क, शीर्षक, हिस्सा, ताबा, वारसा-अधिकार, कौटुंबिक व्यवस्था / सेटलमेंट, दावा किंवा मागणी, बोजा, प्रतीकात्मक ताबा, अधिग्रहण/ विभाजन अधिकार असल्यास किंवा सदर मिळकतीबाबत कुठल्याही व्यक्तीने वर नमूद जमीन मालक किंवा त्यांचे कुटुंबियांपैकी कोणाही बरोबर खरेदी-विक्री, विकसन, कुलमुखत्यार, अभिहस्तांतरण, समजपत्र, ट्रस्ट, रखरखाव, भाडेकरार, वहिवाटीचा परवाना, ईझमेंटरी राइट्स अथवा गहाण, तारण, इ. कुठल्याही स्वरूपाचा व्यवहार केला असल्यास, तसेच कोणत्याही न्यायालयीन आदेश/ मनाई हुकुम, लीस पेन्डन्स, जमिनीवरील आरक्षण इ. बाबत कोणाला काही माहिती असल्यास किंवा त्याला अनुसरून जर कोणाचाही प्रस्तुत व्यवहारास आक्षेप असल्यास, त्यांनी प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत आमचे खालील पत्यावर लिखित स्वरुपात व योग्य त्या कागदपत्रे व पुराव्यानिशी खात्री करून द्यावी, अन्यथा सदर मिळकतीवर इतर कोणाचाही हक्क-हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून, योग्य ती सर्व शहानिशा करून सदर मिळकतींचे मालकी हक्कांबाबत तपासणी अहवाल आमचे अशिलांस सादर केला जाईल. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही ह्याची नोंद घ्यावी. कळावे,

**परिशिष्ट (मिळकतींचे वर्णन)**

मौजे- चांडोळा,ता. मुखेड, जि.नांदेड येथील खालील नमूद शेत-जमिनी, त्यामधील तदंगभूत पीक, तृण-काष्ठ, फळझाडे, विहीरी, जलस्त्रोत, बांधकाम, चीजवस्तू व वहिवाटीचे हक्कांसह: -

| गट क्र. | गाव | क्षेत्रफळ (HectorAres) | मालकाचे नाव | (खाता क्र.) |
|---|---|---|---|---|
| ७४ | चांडोळा | ० हे ७५ आर | दैवशाला गंगाधर तमशेट्टे | ७१३४८ |
| ७२ | चांडोळा | १ हे ८५ आर | गंगाधर मारोतीराव तमशेट्टे | ७१७८३ |
| ८३ | चांडोळा | ०हे ८२आर | बालाजी मारोती सिंगनवाड | १४२ |
| १०१ | चांडोळा | ० हे६१ आर | उमाकांत हनमंतराव तमशेट्टे | ७१७३७ |
| १०१ | चांडोळा | ० हे ६० आर | गजानन हनमंत तमशेट्टे | ७१७३८ |
| १०२ | चांडोळा | १हे२४ आर | चंद्रकांत व्यंकटी पोलावर | २५४ |
| १०३ | चांडोळा | ०हे ८२ आर | धोंड्याबाई संग्राम बोयनर | ७१८६० |
| १०४ | चांडोळा | १हे ०५ आर | लक्ष्मी शिवाजीराव झटकवडे | ७१७५९ |
| १०४ | चांडोळा | १हे ०५आर | अजय शिवाजीरावझटकवडे | ७१९२० |
| १०६ | चांडोळा | ०हे ६० आर | कैलास काशीनाथ स्वामी | १२७ |
| १०६ | चांडोळा | ० हे ७५ आर | गंगाबाई काशीनाथ स्वामी, कैलास काशीनाथ स्वामी, संजय काशीनाथ स्वामी, संगीता महादअप्पा मचटे | ९९ |
| १०७ | चांडोळा | ० हे ६० आर | गंगाबाई काशीनाथ स्वामी, कैलास काशीनाथ स्वामी, संजय काशीनाथ स्वामी, संगीता महादअप्पा मचटे | ९९ |
| १०८ | चांडोळा | ० हे ८१ आर | माधव सूर्याजी आंबेवाड | ५८४ |
| १०८ | चांडोळा | ० हे ८१ आर | बालाजी चंद्रकांत पोलावार | ७१६९९ |
| १०९ | चांडोळा | २ हे ०० आर | आशाताई भ्र व्यंकट माचनवाड | १५९० |
| १०९ | चांडोळा | १ हे ३६ आर | पुष्पाबाई आनंद माचनवाड | ७१५८० |
| १०९ | चांडोळा | १ हे ३१ आर | अक्षय व्यंकटराव माचनवाड | ७१६८४ |
| १०९ | चांडोळा | २ हे ००आर | आकाश व्यंकटराव माचनवाड | ७१६८५ |
| ११० | चांडोळा | २ हे ०० आर | नारायण व्यंकटी पोलावार | ३०३ |
| १११ | चांडोळा | २ हे ०० आर | सुषमा (रेशमा) भ्र गंगाधर पोलावार | १५१ |
| ११२ | चांडोळा | २ हे ०० आर | ज्ञानेश्वर व्यंकट | ७१६६२ |
| ११३ | चांडोळा | २ हे ५४ आर | पांडुरंग व्यंकट पोलावार | ४३२ |
| १२० | चांडोळा | १ हे ६१ आर | विठ्ठल रामा | ७१३१४ |
| १२१ | चांडोळा | १ हे ९६ आर | सैन्याबाई जयवंतराव श्रीरामे | १६२३ |
| १२१ | चांडोळा | १ हे ००आर | जयवंतराव गणपतराव श्रीरामे | ४४४४ |
| १२२ | चांडोळा | १ हे ८२ आर | जळबा जयवंतराव श्रीरामे | १०० |
| १२४ | चांडोळा | १ हे ७२ आर | संजय शिवाजीराव पुंजलवाड | ९८२ |
| १२५ | चांडोळा | १ हे ७३ आर | राजेश शिवाजीराव पुंजलवाड | ७१८४९ |
| १२६ | चांडोळा | १ हे ७३ आर | गजानन शिवाजीराव पुंजलवाड | १५३ |
| १२७ | चांडोळा | १ हे ७३ आर | संजय शिवाजीराव पुंजलवाड | ८३२ |
| १२७ | चांडोळा | ० हे २२ आर | गजानन शिवाजीराव पुंजलवाड | ७०१५ |
| १२७ | चांडोळा | ० हे ४४ आर | गंगाबाईभ्रशिवाजीराव पुंजलवाड | ७०१६ |
| १२७ | चांडोळा | ० हे ६३ आर | शिवाजीराव लक्ष्मणराव | ७०१७ |
| १२७ | चांडोळा | ० हे २२ आर | राजेश शिवाजीराव पुंजलवाड | ७१८४९ |
| १२८ | चांडोळा | ० हे ८० आर | शोभा प्रकाश तमशेट्टे | १११४ |
| १२८ | चांडोळा | ० हे ४० आर | प्रणिता सुनील मुत्तेपवार | ७०३२९ |
| १२८ | चांडोळा | १ हे २० आर | ओंमकार प्रकाश तमशेट्टे | ७१६९१ |
| १३४ | चांडोळा | ० हे ८८आर | वैभव शिवाजीतमशेट्टे | ७१६२२ |
| १३९ | चांडोळा | ० हे ५७आर | राबियाबी नसीबखान पठाण | ७११६४ |
| १३९ | चांडोळा | ०हे ८७आर | वैष्णव शिवाजी तमशेट्टे | ७१७१८ |
| १३९ | चांडोळा | ०हे२९आर | गंगामणी शिवाजीतमशेट्टे | ७१७१९ |
| १४० | चांडोळा | ० हे ३७आर | शिवाजी हनमंता तमशेट्टे | ९१२ |
| ८२१ | चांडोळा | ३ हे ९७आर | दिर्वेद्र तानाजी नवेकर | ३९६ |
| ८२३ | चांडोळा | १ हे२५ आर | सुमनबाई राम नवेकर, दत्ता राम नवेकर, रेखा मारोती जाधव, सपना नारायण जाधव, सुवर्णा सुशील शर्मा | ७७८ |
| ८२४ | चांडोळा | १ हे ४३आर | दयानंद देवेंद्र नवेकर अपाक देवेंद्र तानाजी नवेकर | ७११५८ |
| ८२९ | चांडोळा | १ हे १४आर | रुक्मिणबाई आनंद | ७८१ |
| ८७१ | चांडोळा | ० हे ८१आर | आनंदा गणपती येळगे | १२ |
| ८७१ | चांडोळा | १ हे १२ आर | नारायण गंगाराम झंपलवाड, अतुल नारायण झंपलवाड, संतोष नारायण झंपलवाड | १०६० |
| ८७१ | चांडोळा | १ हे ११आर | गणपत गंगाराम झंपलवाड | २३२ |
| ८७१ | चांडोळा | १ हे १२आर | हानमंत गगाराम | ११०६ |
| ८७१ | चांडोळा | ० हे ३० आर | सुमन नागनाथ स्वामी, सुरेश नागनाथ स्वामी, रुक्मिनबाई मल्लिकार्जुन मठवाले | १२१५ |
| ८७४ | चांडोळा | ४ हे ९८ आर | नरहरी मारोती पोलावार | ६७२ |
| ८७५ | चांडोळा | २ हे ८० आर | नरहरी मारोती पोलावार | ३२९ |
| ९१९ | चांडोळा | २ हे ८० आर | आनिल मारोती पोलावार | ६० |
| ९२२ | चांडोळा | २ हे ८० आर | सुनिल मारोती पोलावार | १०६४ |

**जाहिरात प्रसिद्ध दिनांक:**२६-०२-२०२६
**वकिलामार्फत:**राहुल पसाळकर
**कार्यालयाचा पत्ता:**ऑफिस क्र ४, ३ रा मजला, साई कॉम्प्लेक्स, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००४
**संपर्क क्रमांक:** 8390215140

### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.
संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## राज्यघटनेतील 'सेक्युलॅरिझम'चा खरा अर्थ जाणणे आवश्यक -प्रा. शेषराव मोरे

**नांदेड (प्रतिनिधी)**– आज धर्माने भारतीय समाजजीवन व राजकारणाचा ताबा घेतला आहे. राज्यघटनेतील 'सेक्युलॅरिझम'चा खरा अर्थ कुणी समजून घेत नाही. भारतीय राज्यघटनेत 'सेक्युलॅरिझम' हा शब्द बेचाळीसाव्या दुरुस्तीपूर्वी नव्हता, हे खरे नव्हते. 'सेक्युलॅरिझम' या शब्दाचा 'धर्मनिरपेक्षता' असा केला जाणारा अनुवाद चुकीचा आहे. 'धर्म' या शब्दाचा अर्थ निरनिराळ्या पद्धतीने घेतला जातो. भारतीय घटना धर्माचा वाट्टेल तसा अर्थ घेण्यास प्रतिबंध करते. धर्म आणि सेक्युलर ह्या स्वतंत्र संकल्पना आहेत, असे मत ज्येष्ठ विचारवंत प्रा. शेषराव मोरे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात बोलताना व्यक्त केले. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्राद्वारे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.



भारतीय राज्यघटनेने सुरुवातीपासून धर्मसंस्थेवर मर्यादा घातलेली होती. कायदा व सुव्यवस्था यांच्या अटीवर धर्माचे पालन करणे बंधनकारक आहे. पारलौकिक जीवन हे धर्माच्या कक्षेत असले तरी ऐहिक जीवन हे राज्यघटनेने संचालित केले जाते. सामाजिक स्वास्थ्याला बाधा येईल अशा रीतीने धर्माचे पालन करता येत नाही. यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाने विविध निकालात राज्यघटनेतील 'सेक्युलॅरिझम' या संकल्पनेवर विविध निर्णय देऊन ही संकल्पना स्पष्ट केली आहे. धार्मिक नीति-मत्तेपेक्षा सांविधानिक नितीमत्ता महत्त्वाची आहे. धर्मानुसार नितीमत्ता पाळण्याचे स्वातंत्र्य राज्यघटना देत नाही, असे ते म्हणाले.

चालू वर्ष हे जायकवाडी धरणाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. जायकवाडी धरणाने मराठवाड्याचा पाणीप्रश्न सुटण्यास मोलाची मदत झाली. तरीही मराठवाड्याचा पाणीप्रश्न सुटलेला नाही. डॉ. शंकरराव चव्हाण केंद्राच्या वतीने मराठवाड्यातील पाणीप्रश्नावर आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या सहाय्याने काम केले जाणार आहे, असे मत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. मनोहर चासकर यांनी व्यक्त केले.

मराठवाड्याचे प्रचलित रूप बदलून मराठवाडा एक विकसित प्रदेश म्हणून पुढे आणणे आवश्यक आहे. यासाठी विद्यापीठ डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्राच्या वतीने विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील चारही जिल्ह्यांची पाहणी करणार आहे. या पाहणीनंतर विकासासाठीचा कृती आराखडा तयार करून तो शासनास सादर करण्यात येणार आहे, असे मत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य नरेंद्र चव्हाण यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्राचे संचालक डॉ. दिलीप चव्हाण यांनी केले. कार्यक्रमात प्रा. नंदकुमार बोधगिरे, प्रा. शालिनी कदम, प्रा. बाबुराव जाधव, प्रा. पी. विठ्ठल, प्रा. भाऊसाहेब आदमाने, संदीप जाधव, तात्याराव पवळे, हरीश पाटील, गौतम गायकवाड, लक्ष्मण जाधव, राम जोगदंड, अण्णा पेरुका आदी आणि मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी व संशोधक उपस्थित होते.

## आरपीएफ महिला कर्मचाऱ्याने वाचवले वृद्ध प्रवाशाचे प्राण; पूर्णा रेल्वे स्थानकावरील घटना



**नांदेड (प्रतिनिधी)**– रेल्वे सुरक्षा दल, पूर्णा रेल्वे स्थानक येथे ऑपरेशन जीवन रक्षा अंतर्गत २४ फेब्रुवारी रोजी एका वृद्ध प्रवाशाचा जीव वाचवून सतर्कता आणि धाडसाचे उत्तम उदाहरण सादर केले.

दि. २४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी आठ वाजताच्या सुमारास महिला कॉन्स्टेबल रमा शर्मा (बकल क्रमांक २३३७), आरपीएफ पोस्ट पूर्णा ह्या सकाळ शिफ्टमध्ये कर्तव्य बजावत होत्या. गाडी क्र. १७६१४ पनवेल एक्सप्रेस प्लॅटफॉर्म क्र. २ वर आल्यानंतर त्या संबंधित गाडीत मेरी सहेली या कार्यक्रमाअंतर्गत स्थानकावर कर्तव्यात होत्या.

दरम्यान, गाडी सुटत असताना बाबुराव घाटगे (वय ७५) या वृद्ध प्रवाशांनी धावत्या गाडीत चढण्याचा प्रयत्न केला. मात्र तोल जाऊन ते प्लॅटफॉर्म आणि धावत्या गाडीच्या-मधील धोकादायक जागेत पडण्याच्या स्थितीत आले, ज्यामुळे जीवितास गंभीर धोका निर्माण झाला.

## संशोधनात 'एआय'चा वापर करताना आपला विवेक वापरणे आवश्यक -डॉ. धर्मेश धावणकर



**नांदेड (प्रतिनिधी)** –संशोधनात 'एआय'चा वापर करताना आपला विवेक वापरणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. धर्मेश धावणकर यांनी केले.

आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे जगभरातील माध्यम क्षेत्रात सध्या आमूलाग्र बदल होत असून, या तांत्रिक क्रांतीचा स्वीकार करणे ही काळाची गरज बनली आहे. याच पार्श्वभूमीवर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माध्यम-शास्त्र संकुल आणि मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने 'माध्यम संशोधनात एआयची भूमिका' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. धावणकर बोलत होते. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यापीठ परिसरातील माध्यमशास्त्र संकुलाच्या सभागृहात संपन्न झालेल्या या सत्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर येथील माध्यम तज्ज्ञ प्रोफेसर डॉ. धर्मेश धावणकर यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात डॉ. धावणकर यांनी डिजिटल युगातील पत्रकारिता, जाहिरात आणि जनसंपर्क क्षेत्रातील एआयच्या वाढत्या प्रभावावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, सध्याच्या काळात केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून जागतिक स्तरावर होणाऱ्या तांत्रिक बदलांची माहिती असणे अनिवार्य आहे. माध्यम संशोधनात अचूकता, वेग आणि माहितीचे विश्लेषण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कसा करावा, याचे तंत्र त्यांनी सोप्या भाषेत उलगडून दाखवले. भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी विद्यार्थ्यांनी या नव्या दालनाची ओळख करून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ. सुहास पाठक यांनी भूषविले तर श्री शिवाजी महाविद्यालयाचे जनसंवाद आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. सुधीर इंगळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. माध्यम क्षेत्रातील वाढता तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि संशोधनातील आधुनिकता यावर मान्यवरांनी आपले विचार मांडले.

## महानगरपालिकेत मराठी भाषा गौरव दिन साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठी साहित्यातील ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ 'कुसुमाग्रज' यांचा जन्मदिन २७ फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून महापालिकेत साजरा करण्यात आला. यावेळी महापौर कविता संतोष मुळे यांच्या वतीने मराठी भाषा प्रतिज्ञेचे सामुहिक वाचन करण्यात आले. हा दिवस ज्ञानपीठ पुरस्कार विजेते प्रसिद्ध मराठी कवी विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा केला जातो.

मराठी साहित्याचा गौरव करणे आणि मराठी भाषेचा वापर वाढवण्यासाठी प्रोत्साहन देणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. यावेळी बोलताना पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगून दैनंदिन व्यवहारात मराठीतच संवाद साधण्याचे आवाहन केले. मराठीतील मान्यवर लेखक, कवी व महापुरुषांचे स्मरण ठेवून वाचनाची सवय जोपासावी, असे प्रतिपादन त्यांनी केले.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अजितपाल-सिंग संधू, उपायुक्त नितीन गाढवे, सहाय्यक आयुक्त मो.गुलाम सादिक यांच्यासह मनपातील इतर कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कै. सौ. कुसुमताई शंकरराव चव्हाण यांना धनेगाव येथील समाधी स्थळी चव्हाण कुटुंबियांनी केले अभिवादन

**नवीन नांदेड** –नांदेड तालुक्यातील वडगाव-धनेगाव येथे समाधीस्थळी कै.सौ. कुसुमताई शंकरराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, माजी आमदार अमिता चव्हाण, आमदार ॲड. श्रीजया चव्हाण, सुजया चव्हाण यांच्यासह चव्हाण कुटुंबीय व उपस्थित आमदार, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता धनेगाव येथे समाधीस्थळी फुलांची सजावट करण्यात आली होती. प्रारंभी खासदार अशोकराव चव्हाण यांच्यासह माजी आमदार अमिता चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण, सुजया चव्हाण व कुटुंबातील सदस्य यांनी समाधीवर विधीवत प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेडचे सभापती संजय लहानकर, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे महापौर सौ. कविता संतोष मुळे, मनपा सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, माजी महापौर बलंवतसिंग गाडीवाले, भाजपा नगरसेवक विरेंद्रसिंघ गाडीवाले, सुमित मुथा, सिडको नगरसेवक प्रतिनिधी सतिश बस्वदे, राजू लांडगे, माजी नगरसेवक बालाजी जाधव, संजय इंगेवाड, मंडळ अध्यक्ष भालचंद्र पवळे, माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे, मनोहर पाटील शिंदे, धनेगाव सरपंच पिंटू ऊर्फ गंगाधर पाटील शिंदे, डॉ. नरेश रायेवार, डॉ. अशोक कलंत्री, दलित मित्र माधवराव आंबटवार, दतू देशमुख, आनंदराव गायकवाड, अहातखॉन पठाण, बालाजी पांडागळे, मारोती शंखतीर्थकर, विजय येवनकर, माधव कदम, मिनलताई पाटील खतगावकर, माजी महापौर शैलजा स्वामी, माजी नगरसेविका सौ. ललिता शिंदे, पार्वती कोरडे, श्रीमती सुरेखा नेरलकर, महादेवी मठपती यांच्यासह जिल्ह्यातील भाजपा पक्षाचे पदाधिकारी व महिला पदाधिकारी, ज्येष्ठ कार्यकर्ते, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील पदाधिकारी व नागरिक, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नांदेड निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी समाधीस्थळी अभिवादन केले. ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे, सहायक पोलीस निरीक्षक सचिन गढवे, रेखा काळे व पोलीस कर्मचारी, होमगार्ड यांनी समाधीस्थळी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवला होता. ग्रामीण भागातील आलेल्या वासुदेव मंडळींनी भजन व गारूड गिते सादर केली.

## सौ. सोनाबाई कदम यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड तालुक्यातील तुप्पा येथील ज्येष्ठ महिला नागरीक सौ. सोनाबाई नागोराव पाटील कदम यांचे अल्पशा आजाराने राहत्या निवासस्थानी २७ फेब्रुवारी रोजी दुपारी १.१५ वाजता निधन झाले. निधन समयी त्यांचे वय ८२ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पती नागोराव पाटील व मुले गजानन, जनार्दन, मुरलीधर ही तीन मुले व नातवंडे असा परिवार आहे. २८ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता तुप्पा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत महिला ठार



**किनवट (प्रतिनिधी)** – तालुक्यातील कोठारी येथील पेट्रोलपंपाजवळील धोकादायक वळणावर गुरुवार, दि. २६ रोजी पहाटे ५.४५ दरम्यान सकाळी फिरण्यासाठी बाहेर पडलेल्या नंदाबाई गौतम पाईकराव (वय ५० वर्षे) यांचा अज्ञात वाहनाच्या जोरदार धडकेत जागीच मृत्यू झाला. या दुर्देवी घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या मते पेट्रोल पंपाजवळील हे वळण अत्यंत धोकादायक असून, रस्त्याच्या कडेला वाढलेल्या बाभळीच्या झाडांमुळे समोरून येणारी वाहने वेळेवर दिसत नाहीत. त्यामुळे अपघाताचा धोका कायम निर्माण होतो. या बाबत वारंवार प्रशासन व संबंधित विभागाकडे तक्रारी करण्यात आल्या, मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, अशी खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## मराठीचा अभिमान जपूया; मराठीतच संवाद साधूया -सुरज गुरव



**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठी साहित्यातील लखलखते नक्षत्र आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ 'कुसुमाग्रज' यांचा जन्मदिन २७ फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या हस्ते जिल्हा ग्रंथालयात विविध विषयांवरील ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. ग्रंथालयात मराठी साहित्य, स्पर्धा परीक्षा, इतिहास, विज्ञान आदी विविध विषयांवरील ग्रंथांचे आकर्षक प्रदर्शन मांडण्यात आले होते.

यावेळी बोलताना अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगून दैनंदिन व्यवहारात मराठीतच संवाद साधण्याचे आवाहन केले. मराठीतील मान्यवर लेखक व कवी यांचे स्मरण ठेवून स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासोबतच अवांतर वाचनाची सवय जोपासावी, असे प्रतिपादन त्यांनी केले.

यावेळी कार्यक्रमात कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे तसेच ग्रंथालय शास्त्राचे जनक एस. आर. रंगानाथन यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात कुसुमाग्रज तसेच इतर मराठी साहित्यिकांच्या साहित्याचे विशेष प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या कार्यक्रमास स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी, विद्यार्थिनी व अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**पान १ वरून...**


**मद्य घोटाळ्याप्रकरणी...**

भाऊक झाल्याचे दिसून आले. निकालानंतर बोलताना त्यांनी आपल्या विरोधात पूर्णपणे खोटा गुन्हा तयार करण्यात आल्याचा आरोप केला. राऊस अव्हेन्यू न्यायालयाने केजरीवाल आणि त्यांचे सहकारी मनिष सिसोदिया यांना सर्व आरोपांतून मुक्त केले आहे. ठोस आणि पुरेशा पुराव्यांशिवाय लावलेल्या आरोपांवर विश्वास ठेवता येत नाही, असे स्पष्ट मत न्यायालयाने नोंदवले.

या प्रकरणात सर्वप्रथम आबकारी विभागाचे माजी आयुक्त कुलदीप सिंग यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. त्यानंतर सिसोदिया आणि शेवटी केजरीवाल यांनाही दिलासा देण्यात आला. सीबीआयने दाखल केलेल्या आरोपपत्रात अनेक त्रुटी असल्याचे न्यायालयाने नमूद केले. काही महत्त्वाच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देण्यात तपास यंत्रणेला अपयश आल्याचे निरीक्षण नोंदवत पुरावे कमकुवत व अपुरे असल्यामुळे दिलासा देण्यात आल्याचे सांगितले.




**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

अरब अमिराती (यूएई),सौदी अरेबिया, कतार, बहरीन,कुवेत,ओमान देशांतील करिअरच्या संधी आणि नोकरी मार्गदर्शन

**'बार्टी इंटरनॅशनल करिअर अँड एम्प्लॉयमेंट फेअर'**

✲ कार्यक्रमाचे उदघाटक ✲

**श्री.राहुल कर्डिले** (भा.प्र.से)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, नांदेड

✲ सन्मानीय अतिथी ✲

**श्री.सुनील वारे** (भा.रे.ले.से)
महासंचालक,बार्टी

✲ प्रमुख उपस्थिती ✲

**श्री.विशाल लोंढे** निबंधक,बार्टी

**श्री.प्रकाश बोडके** अध्यक्ष, प्रेरणा कन्सल्टन्सी

**श्री. फहाद गोली** (जनरल मॅनेजर,प्रेरणा कन्सल्टन्सी)

✲ निमंत्रक ✲

**डॉ.बबन जोगदंड** (विभागप्रमुख ,बार्टी)


**श्री.रवींद्र दरेकर** (जनरल मॅनेजर,प्रेरणा कन्सल्टन्सी)

**श्री.महेश गवई** (प्रकल्प व्यवस्थापक,बार्टी)

दिनांक : २८ फेब्रुवारी २०२६ | वेळ : सकाळी ९ ते दुपारी ३ | स्थळ : श्री शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, विष्णूनगर, नांदेड



**सेवानिवृत्ती निमित्त शुभेच्छा**



श्री.सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, महात्मा गांधी हायस्कूल सिडकोचे मुख्याध्यापक

**महम्मद जि.एस. मुखेडकर**

हे आज दि. 28 फेब्रुवारी 2026 रोजी प्रदिर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत असल्याबद्दल आयोजित गौरव सेवापुर्ति सोहळ्याला

**संस्थापक अध्यक्ष कर्मवीर नानासाहेब जाधव** व **कोषाध्यक्ष माजी नगरसेवक श्रीनिवास जाधव** यांच्या उपस्थितीत होत असलेल्या

सेवापुर्ति सोहळ्याला शुभेच्छा...

महम्मद जि.एस.मुखेडकर
मुख्याध्यापक

-शुभेच्छुक-

महात्मा गांधी हायस्कूल सिडको शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी स्टाफ.



**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com